# आशा-गीत

## [ ओढणी व इतर कविता ]

REFBK-0004936
4936

या. भा. पाठक

एम्. ए.

ऑगस्ट १९३३ ] [ किंमत १ रुपाया

प्रकाशक

वा. भा. पाठक, एम्. ए., एस्. टी. सी.

१९८ (२२) सदाशिव पेठ, पुणें २.

सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन.

अनुमतीवांचून यांतील कोणतीही कविता कोणी प्रसिद्ध करूं नये.

मुद्रक

लक्ष्मण नारायण चापेकर,

"आर्यसंस्कृति-मुद्रणालय"

१९८ (१७) सदाशिव पेठ, टिळकरस्ता, पुणें २.

मातृचरणीं —

२५५४८ काव्य
७३५८ दि: ३१।३।

# प्रस्तावना

क्रांतिकारक महाकवीच्या आगमनाचीं शुभचिन्हें महाराष्ट्र-साहित्याच्या क्षितिजावर दिसूं लागल्याची मंगल ग्वाही Bee कवींनीं दिलेल्यास आज दीड तप होऊन गेलें असेल; आणि या 'उगवत्या सूर्या'च्या स्वागत-समारंभास सिद्ध होण्याबद्दल त्यांनीं त्यावेळच्या कांहीं सन्मान्य कवींना सूचना देखील देऊन ठेविल्या होत्या. या भाकिताप्रमाणें सदर जो कोणी महाकवि येणार होता तो महाराष्ट्रांत अवतीर्ण झाल्याचें वृत्त अद्यापि कानावर आलें नाहीं. यासंबंधीं एखाद्या विद्यमान कवीजवळ विचारपूस करावी तर तसें करण्याची सोयही नाहीं; कारण उलट तोच महात्मा छातीवर हात वळवून महाकवीचा जन्म आधींच झाला असल्याचा पुरावा पटवावयाला लागावयाचा आणि हें वृत्त आपल्या कानापर्यंत कसें पोहोंचलें नाहीं याबद्दल अचंबा व्यक्त करावयाचा ! कांहींही असो; एवढी मात्र गोष्ट खरी कीं, यदाकदाचित् एखादा कविश्रेष्ठ महाराष्ट्रांत लौकरच प्रगट होणार असला तर त्याच्या स्वागताला सामोरें जाण्याइतक्या लायकीचे प्रतिभावंत शारदापुत्र आज महाराष्ट्रांत आढळण्यास अडचण पडणार नाहीं. अशा स्वागत-मंडळाच्या ऐन आघाडीला काव्याचा जरिपटका घेऊन चालतांना चंद्रशेखर व तांबे आढळतील व त्यांच्या मागोमाग यशवंत, गिरीश, मायदेव, मा. जूलियन्, अनिल, अनंत काणेकर हे सरस्वतीचे सरदार मानाचे भर-जरी मंदिल घालून जातांना दिसतील तर त्यांच्या लगोलग पिछाडीला चालतांना जे सन्मान्य मानकरी नजरेस पडतील त्यांच्या ओळींत प्रस्तुतच्या कवितासंग्रहाच्या कर्त्यांचा अंतर्भाव करण्यास मुळींच अडचण पडूं नये असें मला वाटतें.

श्री. पाठकांच्या काव्यगुणाचा प्रथम परिचय मला त्यांच्या 'शिवराज आणि बालवीर' (पान ८) या सुंदर नाट्यगीतामुळें झाला. "खबरदार जर टाच मारुनी जाल पुढें चिंधड्या ! उडविन राइ राइ एवढ्या !" अशा

झणझणींत इशाऱ्याच्या शब्दांनीं सुरुवात झालेल्या या तडफदार काव्यांत चिमुकल्या सावळ्याच्या तेजस्वी स्वभावाचें व तिखट इमानाचें चित्र रा. पाठक यांनीं भरदार रंगांत रंगविलेलें आहे. शीतावरून भाताची परीक्षा करणें हें वाङ्मयांत पुष्कळ वेळां धोक्याचें असतें हें माहीत असून सुद्धां त्या एकाच कवितेवरून पाठकांच्या उच्च काव्यशक्तीसंबंधीं त्यावेळीं मी जी अटकळ बांधली होती ती तदनंतर त्यांच्या वेळोवेळीं प्रसिद्ध झालेल्या कवितांच्या व आतां एकत्रित स्वरूपांत प्रसिद्ध होत असलेल्या या त्यांच्या गीतसंग्रहाच्या वाचनानें खरी ठरलेली आहे हें पाहून मला फार आनंद वाटतो. म्हणून या पुस्तकाला अभिप्रायादाखल थोडेसें प्रास्ताविक जोडण्यासाठीं पाठकांनीं आपल्या स्वभावसहज विनयानें मला जेव्हां सुचविलें तेव्हां ‘ आशा-गीता ’ च्या कर्त्याला मी या बाबतींत निराश करणें केव्हांही शक्यच नव्हतें.

एखाद्या कवीच्या काव्याचें परीक्षण करण्याचे अनेक प्रकार आहेत, तशाच काव्यांतील गुणावगुण पारखून पाहण्याच्या कसोट्याही अनेक आहेत. तथापि, परंपरागत चालत आलेल्या शास्त्रीय संकेतांनीं किंवा आपण आपल्या मनांत आधींपासून योजून ठेवलेल्या नियमांच्या मोजमापांनीं कवीची कविता मापून पाहण्याऐवजीं जगाकडे पाहण्याचा कवीचा कोणता दृष्टिकोण आहे हें त्याच्याच काव्याच्या सहाय्यानें समजून घेणें हें अधिक श्रेयस्कर आहे अशी माझी समजूत आहे. ज्या विशिष्ट परिस्थितींत कवि वाढलेला असतो ती परिस्थिती समजून घेतल्यानेंच कवीच्या विचारवैभवाची, अनुभवसंपन्नतेची व जीवनविषयक कल्पनांची आपणांस यथार्थ प्रतिति होणें शक्य असते. अर्थात् केवळ कवितांच्या आधारावर कवीचें जीवनचित्र कल्पिणें हें नेहमींच साधत नाहीं. कित्येक वेळां कवि दुसऱ्यांचे अनुभव देखील वर्णन करीत असतो. निव्वळ काव्यावरून चारित्र्यविषयक तर्ककुतर्क करीत बसल्यानें टीकाकार कसा फशीं पडतो याचें उदाहरण ‘ जनसंमर्दीं सौंदर्य धुंडणें ’ ही ओळ लिहिणारे गोविंदाग्रज खाजगी आयुष्यांत वैषयिक नजरेनें स्त्रियांचे चेहेरे बघत होते असा अधम शोध एका विचित्र लेखकानें लावला आहे हें दाखवून देतां येईल.

आपल्या स्वतःच्या काव्याच्या टीकाकारासंबंधीं खुद्द पाठकांची जी कल्पना आहे ती वाचून त्यांच्या भोळ्या व निष्पाप मनोवृत्तीचें खरोखरच कौतुक करावेसें वाटतें (पान ३). आपलें काव्यलिखाण तो टीकाकार 'स्नेहाळ दृष्टी' तूनच बघेल याबद्दल पाठकांना खात्री वाटते. एवढेंच काय पण आपलें काव्य टीकाकारानें हातीं घेतलेलें बघून त्यांना 'स्वर्गहि तुच्छ गमतो!' टीकाकाराकडून ते सद्गुण दर्शनाची, सौम्य वचनाची व उत्साह-दानाची अपेक्षा करतात. एखादा खवचट टीकाकार पाठकांच्या आळींतून अद्यापि गेलेला दिसत नाहीं. इतक्या प्रांजळ ऋजुतेनें टीकाकाराकडे बघणाऱ्या कवीची थट्टा इच्छा असून देखील एखाद्याला करतां येणें शक्यच नाहीं. पाठकांची ही मऊ मेणाची विष्णुदासी वृत्ती एखाद्या वज्रमनाच्या टीकाकारालाही पाघळून टाकील यांत संशय नाहीं.

पाठकांचें बालपण एखाद्या लहानशा सुंदर खेडेगांवांत गेलें असावें. म्हणूनच तेथील नैसर्गिक सौंदर्याचा व आनंदी वातावरणाचा गोड ठसा त्यांच्या अंतःकरणावर चांगला उठलेला दिसतो. 'खेड्यांतील आनंद' या त्यांच्या कवितेंत (पान १२), त्यांनीं खेडेंगांवांतील एका दिवसाच्या आयुष्य-क्रमाचें मनोहर चित्र मोठ्या कौशल्यानें चितारलेलें आढळतें.

> गांवशीवेच्या वृक्ष साउलीस
> बसे कोणी पांथस्थ विसाव्यास,
> निघे पाण्यावर गुरावासरांचा
> थवा येई वर लोट तो धुळीचा.
> नाद कानावर पडे घुंगराचा
> सूर मिसळे त्यामधें पावरीचा!

हें खेडेंगांवांतील दुपारच्या देखाव्याचें दृश्य व

> ऊन पसरे कोंवळें सोनियाचें
> कळस पिवळे शोभती देवळांचे
> थवा आकाशीं उडे पाखरांचा
> मार्ग धरुनी आपल्या कोटरांचा.
> दावणी वासरें ओढ घ्याया
> आणि आतां लागली हंबराया!

हें सायंकाळचें मनोहर शब्दचित्र बघून पाठकांप्रमाणें कोणाला असें वाटणार नाहीं कीं—

मीहि वाटे त्यांच्यांत मिळुन जावें
आणि सौख्यीं त्या भागिदार व्हावें !

त्याचप्रमाणें अभ्यासासाठीं शहरांत राहणारा विद्यार्थी सुट्टीच्या दिवसांत आपल्या खेडेगांवांतील घराकडे परत येतांना त्याच्या मनाची जी गोड खळबळ उडते, विशेषतः गांवाजवळ आल्यावर निरनिराळ्या ओळखीच्या खुणा, परिचयाचीं शेतें, देवळें, बाळपणीच्या माहितीची मंडळी भेटतांच त्याच्या हृदयांत हर्षाचें भरतें चढूं लागतें. या सर्व अनुभवाचें अत्यंत हृदयंगम चित्र ' खेड्यांतील घराकडे ' ( पान २८ ) या कवितेंत पहावयास मिळेल. आपल्या ताईला व धाकट्या भावाला घरांत मागल्या दारानें एकदम शिरून कसें चकीत करावयाचें, तसेंच आईला पण थक्क कसें करून सोडावयाचें याबद्दलचे मजेदार बेत करीत करीत तो विद्यार्थी आपल्या घराच्या जवळ येतो.

चाफा दिसतो स्पष्ट आमुच्या येथुन परसांतला
पहा किती उंच तरी वाढला !
माळवदावर उभे राहुनी अरे, परन्तु असें
पाहते मजकडेच कोणसें !
ह कळले ही तर ताई माझी गडे !
किती रोखुन टाकी दृष्टी ही मजकडे
धाईत सांगण्या गेली आईकडे

अशा रीतीनें चिमुकल्या ताईनें आपल्या भावाची माळ्यावरून आधींच टेहेळणी केल्यामुळें त्याच्या मनांतले मनोरे पार ढासळून पडतात. बाळमनाचें जिव्हाळ्यानें रंगविलेलें इतकें हृदयस्पर्शी चित्र माझ्या अवलोकनांत नाहीं. पाठकांची एवढी कविता देखील त्यांच्या मार्मिक-कल्पनाशक्तीची व हळुवार भावनांची ओळख करून द्यावयास पुरी आहे.

सामान्य माणसाच्या संसारांत सुखापेक्षां संकटेंच अधिक. निरभ्र उन्हाचे दिवस आयुष्यांत फार थोडे. नेहमीं आभाळ भरून आलेलें असावयाचें

व कसली तरी मुरमुर डोक्यावर सांडत असावयाची. अशा मगमगीनें मन कंटाळून अनेक वेळां अस्वस्थ होतें. विरंगुळा म्हणून कसा तो वाटतच नाहीं.

घरांत यावें शांती नाहीं
दारीं जावें शांती नाहीं
एकांतीही शांती नाहीं

स्वतःच्या हालअपेष्टा आपण एकवेळ कशा तरी सहन करतों; स्वतःचे अश्रु तसेंच मनांतल्या मनांत गिळून टाकूं शकतो; पण आपल्या परवडींत आपल्या आवडत्या माणसाची गांजणूक झालेली पाहून मनांत दुःखाचे कढ अधिकच उसळूं लागतात.

दुःखीकष्टी घरांत यावें
माउलीस दुःखांत पहावें
आपण आपुलें दुःख गिळावें

आणि मग मात्र जिवाची कालवाकालव असह्य होऊन डोळ्यांतून अश्रू पाझरूं लागतात व आपल्या तोंडून कळवळ्यानें पुढील शब्द निघतात.

काय तरि केला। अपराध असा मीं बोला? (पान २०)

अशा तऱ्हेच्या सामान्य माणसाच्या प्रत्ययाला येणारी केविलवाणी मनःस्थिति अनुभवाशिवाय वर्णन करतां येणें शक्यच नाहीं.

आपल्या महत्त्वाकांक्षांचा प्रतिकूल परिस्थितीमुळें आपल्या डोळ्यासमोर चुराडा झालेला पाहण्याइतकें दारुण दुःख मानी मनाला दुसरें नसेल. अशाही स्थितींत ध्येयावर नजर ठेवून मोठ्या धैर्यानें मनुष्य पुढें जात असतो.

तप्त वाळवंटांतुन
निजकर्तव्या जाणुन
चालावें मात्र बघुन
ध्येय मृगजळाला!

तथापि, नालायक लोकांची जगांत चाललेली भरभराट, बाह्य डामडौलाला भुलण्याची जगाची प्रवृत्ति, पैशासाठीं प्रियजनाकडून होणारा विश्वासघात इत्यादि गोष्टींच्या दुरवलोकनानें मन संतापानें भडकून जातें व अशा या जगाच्या वैराण वाळवंटांत जीवन कंठण्यापेक्षां

पंजरांत जीवविहंग
रात्रंदिन करि तगमग
भेट तया दे लगबग
मुक्त कर दयाला !

अशी परमेश्वराला प्रार्थना करूं लागते.

संसारांतील कडवट अनुभवांचीं असलीं चित्रें पाठक फारच चांगल्या तऱ्हेनें रेखाटूं शकतात. आयुष्याच्या ऐन आरंभाला अनुभवाच्या प्याल्यामधील तळींचा कडू गाळ पिण्याचें त्यांच्या नशिबाला आलें असलें तरी त्यामुळें निराश होण्याइतकें त्यांचें मन दुबळें नाहीं.

करुं नये वाटते भ्रमण भविष्यांतुनी
द्यावीच जागच्याजागीं ही पीडित वपु टाकुनी. (पान ३८)

असें नैराश्यावेगांत त्यांना कधीं कधीं वाटत असले तरी त्यांचा आशावाद फारच दांडगा आहे. मनाच्या उद्वेगांत व जीविताच्या क्षणभंगुरतेंत देखील आनंद मानण्याइतकी त्यांच्या आशावादाची मजल आहे एवढें सांगितलें म्हणजे पुरे.

चांचल्य जीविताचें, देई मला सुखास.
निश्चिंत मानसाचा, उद्वेष चित्तिं वागे
क्षोभामधें तयाच्या सौख्यांत मी तरंगें. (पान १७)

संकटाच्या खडकावर उंचावरून आपटल्यामुळें शतशः खंडित होणाऱ्या जीवनाच्या प्रवाहांत त्यांना आशेचें इंद्रधनुष्य चमकतांना दिसतें यावरून त्यांचें आशावादित्व किती उज्ज्वल आहे हें कळून येईल.

अधःपात खडकावरतीं होतसे जळाचा
उद्भवली त्यांतुन माला रम्य तुषारांची
तीच वैभवश्री आमुची जगा दिसायाची
दुजा हेतु नाहीं आमुच्या भग्न जीवनाचा ! (पान ३१)

हीं गीतें वाचलीं म्हणजे पाठकांनीं आपल्या कवितासंग्रहाला ‘आशा-गीत’ हें किती समर्पक नांव दिलें आहे त्याची प्रचिती पटते. जगांतील सुखदुःखाच्या चढउताराकडे समाधानाच्या दृष्टीनें पाहण्याची त्यांची प्रवृत्ति

'चढउतार' (पान २) या कवितेंत सुंदर तऱ्हेनें प्रतिबिंबित झालेली आहे.

चढ उतारावरी रम्यपणा
लाभला खरोखर या भुवना.
उभी पिकें शेतांत राहिलीं,
वाऱ्यानें वर खालीं झालीं
अगाध शोभा त्यांत रंगली
ही वीज सरळ का लवतांना ?

निसर्गाच्या सृष्टींत प्रत्यही आढळणारी ही मनोरम उन्नति व अवनति पाठकांनीं मोठ्या मार्मिक दृष्टीनें अवलोकन केलेली आहे.

त्यांच्या आशागीतांच्या मौक्तिकमालेंत मेरुमणि म्हणून शोभेल असे 'हे दीप लागले चोंहिकडे' हें त्यांचे काव्य आहे. भोंवतालीं माजलेल्या निबिड अंधकारांत लुकलुकणाऱ्या चिमुकल्या तारकामधें त्यांना साक्षात् सूर्याचें तेज तळपतांना आढळतें आणि म्हणूनच ते आत्मविश्वासाच्या धैर्यानें निराश मनाला आश्वासन देतात.

हे दीप लागले चोंहिंकडे
अंधार कशाचा बोल पडे ?
असति न तारा या लुकलुकत्या
मिणमिणत्या वा जळत्या पणत्या
निरंजनांतिल वाती विझत्या
तळपतात हे तर सूर्य खडे ! (पान ५)

ही कविता कोणत्याही दुबळ्या माणसाच्या मनांत चैतन्य उत्पन्न करून त्याला कार्यप्रवण करील !

जगांतील अपमानानें पाठक चिडून जाऊन संतापाची भाषा बोलत नाहींत. त्यांची नम्रवृत्ती व विनय खरोखरच आल्हादकारक आहेत. नोकरी-वरून दूर केलेला एक नोकर त्वेषानें धन्याशीं दुरुत्तरें न करतां

—असाच आतां रहा सुखानें नांदुन तूं जगभर
अस्तोदय पावती जोंवरी सूर्यचंद्र तोंवर ! (पान ७)

असा स्मित मुद्रेनें आशीर्वाद देऊन त्याचा निरोप घेतो. या प्रसंगांत देखील पाठकांची उपरि निर्दिष्ट संतोषवृत्तिच प्रगट होत नाहीं का?

वर्तमानासंबंधीं समाधान, भविष्यासंबंधीं आशा हें जसें पाठकांच्या काव्याचे उज्ज्वल गुण आहेत, तसेंच भूतकालासंबंधीं– विशेषतः महाराष्ट्राच्या उज्ज्वल इतिहासाबद्दल जळजळीत अभिमान हेंही त्यांच्या काव्याचें एक चित्ताकर्षक वैशिष्ट्य आहे. सह्याद्रि पर्वताच्या दर्शनानें त्यांच्या डोळ्यापुढून महाराष्ट्राच्या गतवैभवाची तेजस्वी चित्रें सरकूं लागतात व त्या वेळचे ते महाप्रतापी वीर फिरून या दुर्भागी देशांत केव्हां अवतीर्ण होतील हें जाणण्याची तीव्र उत्कंठा त्यांच्या मनांत जागृत होते. आणि म्हणून ते विकल अंतःकरणानें विचारतात—

अशीं दिव्यें करायाला, वराया मृत्यु वीरांचा
पुन्हां हा शूर सह्याद्री कधीं लोकी उठायाचा? (पान ३४);

महाराष्ट्राचा विनाश त्यांना स्वप्नांत देखील पाहवत नाहीं (पान २६). काव्यप्रेमी तरुणांना त्यांनीं जो संदेश दिला आहे तो त्यांच्या राष्ट्रप्रेमाचा उत्कृष्ट निदर्शक आहे (पान २२).

स्वधर्मनिष्ठा राखून– गाउन उर्जस्वल गान
जे गेले संत हरून– राष्ट्राचे पंचप्राण
ती त्यांची मधुरावाणी– मृतास कीं मधु निर्झरिणी.
खेळव तूं राष्ट्रांतून-- हालव जन निद्रामग्न
देशोद्धारास्तव अंतीं-- कलावंत तूं ये पुढती.

प्रस्तुत संग्रहांतील पाठकांच्या ऐतिहासिक व राष्ट्रीय कविता वाचून तशा प्रकारच्या त्यांच्या अधिक कविता वाचण्याची जिज्ञासा वाचकाच्या मनांत उत्पन्न होते. पाठकांच्या अप्रकाशित कवितांत अशा कवितांचा पुष्कळसा संग्रह आहे असें कळते. त्या कविता प्रसिद्ध झाल्यास त्यांच्या स्फूर्तीचा एक तेजस्वी पैलू पाहण्याचें समाधान वाचकांना मिळेल.

पाठकांची प्रेमविषयक काव्यें या संग्रहाच्या अखेर 'प्रणयगीत' या प्रकरणांत अंतर्भूत केलेलीं आढळतील. 'प्रणयगीत' या मथळ्यामुळें वाचकांचा थोडासा घोंटाळा होण्याचा संभव आहे. विवाहपूर्व प्रियाराधन--

विषयक उत्तान शृंगाररसाचीं गीतें या दृष्टीनें जर या प्रेमकाव्याकडे बघावयाचा प्रयत्न कोणी केला तर त्याची निराशा होईल. या गीतांतून **माधव जूलियन्**चा उमरखय्यामी मस्त शृंगाररस उतास चाललेला आढळावयाचा नाहीं किंवा त्यामधून **आनंद** कवीचा किंवा **अनंत काणेकरांचा** मिष्कील रंगेलपणाही लवथवलेला सांपडावयाचा नाहीं. उत्तानपणा किंवा विलासीपणा ही पाठकांची मुळीं मनोभूमिकाच नाहीं. त्यांची सौंदर्यावलोकनाची तळमळ समाजबंधनाच्या नियंत्रणानें मंदावलेली वाटते. 'विरोधी प्रेम' या कवितेंत एक तरुणी आपल्या वल्लभास म्हणते (पान १०३)

माझ्या दारावरून होते तुमचे जाणें येणें
झालें नाहीं परंतु तुमचे वरतीं चुकुन पहाणें !

या पद्यपंक्तित सूचित केलेली त्या तरुणाची भिडस्त, संकोची व लाजरी वृत्ति कदाचित् खुद्द कवीचीच असावी काय असा संशय येतो. पाठकांची प्रेमपिपासा फार महत्त्वाकांक्षी नाहीं. प्रणयिनीची सुभगाकृति लांबून बघून देखील त्यांचा 'हृत्सिंधु मोदें भरतो अथांग'. (पान १०७) किंवा 'चित्तीं स्थापुन मूर्तरूप करितों आहे तुझें पूजन' (पान १००) अशा तऱ्हेची ते मानसपूजा करूं लागतात. कधीं एखादे वेळीं 'उत्कंठा' (पान ११०) हृदयांत अनिवार झाल्यामुळें 'सखे ! आणि माझ्या जिवाच्या चकोरा ! मुखीची तुझी चंद्रिका भेटूं दे' असें म्हणण्यापर्यंत त्यांची मजल जाते. तथापि एकंदरींत या विषयांत पाठकांचें 'मन रमत नाहीं आणि जीव जमत नाहीं.' 'मी तो राकट चालतां पदतलीं संचूर्ण होतो शिला' (पान ९९) किंवा 'मम गभीर बनुनि मति। सुस्वभाव सहजगति' या ओळींत त्यांची ही वृत्ति व्यक्त होते. 'Fortune favours the brave' या म्हणींत सुचविलेला धाडस हा यशोदायी गुण प्रेमाच्या सृष्टिंत वल्लभाच्या अंगीं अत्यावश्यक समजला जातो. प्रियाराधनांत 'जिंकायला आलों' हीच भावना 'पुरुषपार्थी' च्या अंगांत असल्याशिवाय प्रेमकाव्याला खरी लज्जत येत नाहीं. प्रीतिविषयाशीं एकतानता न पावणें हा पाठकांच्या प्रेमकाव्याचा दुसरा दोष आहे. कोणा एका 'मोहिनी' च्या सौंदर्याचें इंद्रजाल त्यांच्या दृष्टीवर भुरळ टाकते न टाकते तोंच 'ध्येयाचे अत्युच्च

गिरी ’ त्यांच्या मनःश्चक्षूपुढें दिसूं लागतात. ‘ मोहिनी ’ ला दृढालिंगन देणें म्हणजे ‘ धूळींमधें जीवन ’ मिसळण्यासारखें आहे असें त्यांना वाटतें. (पान १०१) आपल्या आवडत्या सुंदर बालिकेच्या वदनाची चंद्रकोर निरखून बघण्यास त्यांना अवसर नाहीं किंवा तिनें गुंफिलेल्या आपल्या गुणगौरवाची माला गळ्यांत घालून घेण्यास त्यांना सवड नाहीं. कारण

मज परि नित लागे ध्यास मन्मायभूचा
अवसर मज कोठे गे तुला गावयाचा ! (पान १०५)

यांतच पाठकांची द्विधा होणारी मनःस्थिति प्रगट होते. तथापि, या ‘ प्रणयगीतां ’ त ‘ तूं आणि लोकभ्रम ’ (पान १०२) व ‘ उत्कंठा ’ (पान ११०) हीं प्रेमगीतें हृदयंगम आहेत.

आतां, ‘ आशा-गीतां ’ तल्या एका उज्ज्वल भागाचा उल्लेख करण्याचें उरलेलें आहे. हा भाग म्हणजे १०८ अभंगाची ‘ ओढणी ’ हा होय. या ‘ ओढणीं ’ तला प्रत्येक मणि नवकल्पनेनें व भावनेनें ओथंबलेला आढळून येईल. गोविंदाग्रजांनीं ‘ अनामिकाचे अभंग ’ लिहिल्यापासून अनुकरणप्रिय महाराष्ट्रीय कवीमध्यें अभंगलेखनाचा मार्ग चोखाळण्याचा एक शिरस्ताच पडून गेला आहे. तथापि बहुतेक कवींचें हें अभंग म्हणजे चंद्रभागेचिया तटीं साधुसंतांनीं उघडलेल्या भावभक्तीच्या पेठेतून आडगिऱ्हाइकी खरेदी केलेला सस्ता सवदाच असतो. तथापि, पाठकांच्या अभंगांत असली उष्टावळ जमा केलेली आढळत नाहीं ही आनंदाची गोष्ट आहे. ‘ ओढणी ’ चा विषय जरी जुना व परिचित असला तरी तिची जडणघडण अगदीं आधुनिक वाटते. प्रत्येक अभंगांतून कोमल कल्पनेची ताजी हिरवळ विखुरलेली दिसते– उपमांची व उत्प्रेक्षांचीं रानफुलें डोकावतांना आढळतात आणि भावनेचें रुपेरी ओहळ रुमझुम नाचतांना नजरेस पडतात. पावसाची चांगलीशी सर येऊन गेल्यावर गांवाबाहेरच्या एखाद्या डोंगरमाथ्यावर पाय-वाटेनें वळणें घेत घेत चढतांना जसें वाटतें तसें हे अभंग वाचतांना वाटतें. त्यामधील भाषेचा, कल्पनेचा व विचाराचा ताजेपणा मनाला सारखा भुरळ घालतो. पारंपरिक विचाराची संताळ्याची गांठोडी सोडून त्यांतील चिंध्या चिवडींत न बसतां अगदीं अभिनव तऱ्हेनें अभंगसृष्टींतून विहार

29६४२ ९३ ६१



करण्यांत पाठकांनीं चांगलेंच यश पैदा केलें आहे, त्याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें जरूर आहे.

एकंदरींत पाहतां, पाठकांच्या कल्पनेंत मनाला थक्क करून टाकणारी गरुडाची भरारी नसली, तरी फुलाफुलावर झेपावणाऱ्या फुलपांखराची मनाला भुलवणारी मोहक नाजुकता आहे. त्यांच्या आशादायित्वांत खडबडून जागे करणाऱ्या डफाच्या थापेचा कडकडीतपणा नसला, तरी प्रातःकाळीं मनांत प्रसन्नता उत्पन्न करणाऱ्या सनईचा सुरेलपणा आहे. त्यांच्या भावनेंत कड्यावरून कोसळणाऱ्या उच्छृंखल प्रतापाचा वेग व नाद नसला; तरी हिरवळींतून लपतछपत झुळझुळणाऱ्या झऱ्याचें गुंगवणारे संगीत आहे. त्यांची कविता कृत्रिम अनुप्रासयुक्त शब्दांच्या संगमरवरी घाटामधून वहात नाहीं. तिच्या काठीं परिचित शब्दांची ताजीतवानी झाडेंझुडपें प्रसन्नतेनें माना डोलवितांना आढळतात.

साध्या शब्दासंगें कविता रांगते
तीस का लागते यातायात ?

या ओळीमधेंच पाठकांनीं आपल्या स्वतःच्या काव्यरचनेचें समर्पक वर्णन केलें आहे असें म्हणावयास हरकत नाहीं.

भाषेची, विचाराची व भावनेची सहजता व सुलभता हेंच पाठकांच्या काव्याचें रम्य वैशिष्ट्य आहे. अधूनमधून त्यांना 'गूढगुंजना' ची लहर येते व मग ते द्वैताद्वैताची – सगुणनिर्गुणाची किंवा आद्यंताच्या टोकावर बसून मौजा करण्याची भाषा बोलूं लागतात. पण असे प्रसंग अत्यल्पच. सांसारिक मनाला पाठकांच्या काव्यांत अनुभवाच्या खाणाखुणा जागोजाग आढळतात आणि म्हणूनच त्यांचें काव्य जसजसें अधिक वाचावे तसतसा त्याला त्याबद्दल अधिक जिव्हाळा वाटूं लागतो.

पाठकांचे हें 'आशागीत' त्यांच्या कवितेच्या उज्ज्वल भविष्यासंबंधीं रसिकांच्या मनांत आशा उत्पन्न करणारें आहे यांत संशय नाहीं. पाठक हे नुसतेच कवि नाहींत. म्हणजे काव्योत्पादन हा त्यांचा एकमेव धंदा नाहीं. ते वाङ्मयाचे व्यासंगी विद्यार्थी आहेत. ते वाचणारे आहेत– डोळे उघडून भोंवतालीं बघणारे आहेत– ते विचार करणारे आहेत. 'आशा-

गीता ' च्या यशामुळें आपलें डोकें स्वर्गाच्या आढ्याला लागल्याची भावना होण्याइतके ते अल्पसंतुष्ट नाहींत. नुकतेच विश्वविद्यालयीन परीक्षेंत त्यांनी जें थोर यश मिळविलें आहे त्यामुळें त्यांच्या जीवितक्रमांतील भाग्यकाळ जवळच आला आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. आणि हा आयुष्यांतील यशाचा उजळा त्यांच्या काव्यांत प्रतिबिंबित होऊन ते अधिकाधिक उज्ज्वल होईल असें समजावयास कांहींच प्रत्यवाय नाहीं. महाराष्ट्रीय रसिक या ' आशागीता ' चे सहर्ष स्वागत करतील व

> फुलोनी पुष्प आमोदा । सुखें वाऱ्यावरी वाही
> कुणी आस्वाद घेवो वा । न घेवो खंत त्या नाहीं !

अशीं पाठकांनीं आपल्या काव्यासंबंधीं जी उदासीन वृत्ति दर्शविलेली आहे ती दाखविण्याचें त्यांना मुळींच कारण नाहीं अशी त्यांची खात्री पटवून देतील अशी आशा आहे.

ता. ८।८।१९३३. प्रल्हाद केशव अत्रे.



४८३६

# सांगावयाचें तें —

गेल्या दहाबारा वर्षांतील प्रकाशित व अप्रकाशित कवितांपैकीं काहींचा सोबतच्या काव्यसंग्रहांत समावेश केला आहे. ‘आशागीत’ ‘ओढणी’ व ‘प्रणयगीत’ असें संग्रहाचे तीन भाग करून सर्वांस ‘आशागीत’, हें नांव दिलें आहे.

‘वि. कृ. चिपळूणकर स्मारक मंडळी’ ने ह्या वर्षी एम. ए. च्या परीक्षेंत मराठी हा ऐच्छिक विषय घेऊन पहिला येणारास दीडशें रुपयांचें बक्षीस ठेविलें होतें ! मला त्या संधीचा फायदा घेतां आला म्हणूनच एक प्रकारचे आर्थिक उत्तेजन मिळून मला चालू काळांतही कवितेचा संग्रह प्रसिद्ध करण्याचें धाडस झाले !

तथापि डॉ. वा. गो. परांजपे, यांनीं माझ्या ह्या धाडसास व्यवहारांत आणण्याचें व मजसारख्या नवख्या इसमास आर्यसंस्कृति मुद्रणालयाचे उत्साही मॅनेजर श्री. चापेकर यांनीं वेळोवेळीं अडचणींतून निभावून नेण्याचें काम केले याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतों.

गुरुवर्य मालशे, सुपरिंटेंडेंट, म. ए. सो. हायस्कूल, ह्यांनीं माझ्या या प्रथम-प्रकाशनास दिलेल्या सक्रीय प्रोत्साहनाबद्दल व सहानुभूतीबद्दल त्यांचा मी फार आभारी आहें !

माझा उत्कट हेतू लक्षांत घेऊन व विनंतीला मान देऊन साहित्याचार्य तात्यासाहेब केळकर, प्रो. पोतदार, श्री. गुरुवर्य माटे व गुरुवर्य किंकर यांनीं पुस्तकावर आपले गुणग्रहणात्मक विचार प्रकट केले ह्याबद्दल मी त्यांचा फार कृतज्ञ आहें.

प्रख्यात विनोदी लेखक श्री. प्र. के. अत्रे ह्यांनीं माझ्या पुस्तकास गंभीर व चर्चात्मक प्रस्तावना देऊन मला कायमचें ऋणी करून ठेविलें आहे.

माझ्या स्नेह्यांनीं हें आशागीत सर्वांगसुंदर व्हावें म्हणून अपरिमित साहाय्य केले. पुस्तकाच्या वेष्टनचित्राची अभिनव कल्पना माझे

रसिक व उत्साही स्नेही श्री. विठ्ठलराव चितळे, बी. ए. (ऑनर्स) यांची आहे. तसेंच ह्या कल्पनेस मूर्तस्वरूप आणण्याकरितां पुण्याचे कलावंत फोटोग्राफर श्री. वा. ना. भट, ह्यांनीं त्यांचा माझा पूर्ण परिचय नसतांही आपुलकीचे परिश्रम घेतले ह्याबद्दल त्या मित्रद्वयांचा मी आभारी आहें.

पण चि. अलँड सुधा हिला तिचे हौशी काका व माझे प्रिय सुहृद श्री. ना. के. देशपांडे बी. ए. (ऑनर्स) ह्यांनीं कोणता कानमंत्र दिला नकळे. परंतु वेष्टनचित्रावरील फोटो घेत असतां आमच्या मनांतील भाव ओळखून तिने दाखविलेलें तादात्म्य ह्याबद्दल सुधेस शाबासकी व नागेशरावांस भलेपणा देणें इष्ट आहे.

पुस्तक छापून होत असतां काव्यावरील टीकात्मक चर्चेचें नीरस काम माझे कविमित्र श्री. गणेश हरी पाटील, बी. ए. श्री. रंगो गोपाळ दुनाखे, बी. ए., एल्एल्. बी. वकील, बारामती व श्री. पण्डित सप्रे ह्यांनीं स्वीकारिलें म्हणूनच आज आशागीताच्या प्रकाशनाचा मंगलदिन उगवला.

जें सांगावयाचें होतें तें सांगितलें. अजूनही जें सांगावयाचें आहे– परंतु सांगतां येत नाहीं तें प्रेमळ रसिकांच्या स्वाधीन करतों.

वामन भार्गव पाठक.

# अनुक्रमणिका

## आशा-गीत


| | |
|---|---|
| शारदेस .... ... ... | १ |
| चढ उतार ... ... ... | २ |
| टीकाकारास ... ... ... | ३ |
| विश्वाच्या उपवनांत ... ... ... | ४ |
| हे दीप लागले चोहिकडे... ... ... | ५ |
| धनवंतास .... ... ... | ६ |
| शिवराज आणि बालवीर ... ... ... | ८ |
| बाल-लीला ... ... ... | १० |
| निवडुंगाचें गाणें ... ... ... | ११ |
| खेड्यांतील आनंद ... ... ... | १२ |
| शांतिपाठ आणि आक्षेप ... ... ... | १४ |
| निर्वाणीचा सवाल ... ... ... | १६ |
| माझी आवड ... ... ... | १७ |
| मायावती ... ... ... | १८ |
| काय तरी केला अपराध ? ... ... | २० |
| भयचकित हरीण ! ... ... ... | २१ |
| आवाहन ... ... ... | २२ |
| अवसानघात ... ... ... | २३ |
| स्वप्नांत काय पाहिलें ? ... ... ... | २४ |
| पाळणा ... ... ... | २७ |
| खेड्यांतील घराकडे ... ... ... | २८ |

| | |
|---|---|
| तीव्र उन्हाळा ... ... ... | ३० |
| भग्नजीवन ... ... ... | ३१ |
| लाभुं दे तुझी मज पडछाया ! ... ... | ३२ |
| कल्पना आणि ध्येय ... ... ... | ३३ |
| पूर्वस्मृति ... ... ... | ३४ |
| शिवप्रभूचें गान ... ... ... | ३५ |
| अरुण ... ... ... | ३६ |
| अनुताप ... ... ... | ३८ |
| फुलमाळीण .... ... ... | ३९ |
| आवडीची भिक्षा ... ... ... | ४० |
| संभाजी ... ... ... | ४१ |
| सदरेंतील पैजेचे विडे ... ... ... | ४२ |
| ' अजून आहे फुटावयाचें सख्या पुढें तांबडें ! ' ... | ४४ |
| होईल फिरून भू शांतमया ... ... | ४५ |
| 'तूं आणि संसृतिताप' ... ... ... | ४६ |
| " आणिलें तयें मज शांतिस्थानाप्रत " ... ... | ४७ |
| नास्तिकाचे विचार ... ... ... | ४९ |
| ती धन्य बंदिशाला ... ... ... | ५२ |
| निर्भय हो ... ... .... | ५४ |
| मज झोंप शांत घेऊं दे ... ... ... | ५५ |
| गान समर्पण ... | ५५ |


## ओढणी


अभंग १ ते १०८ ... ... ... ... पृ. ५७ ते ६८

## प्रणय-गीत


| | |
|---|---|
| स्त्री आणि पुरुष ... ... .... | ९९ |
| तूं आणि तत्वज्ञ ... ... .... | १०० |
| मोहिनी ... ... .... | १०० |
| तो प्रसंग ... ... .... | १०१ |
| ती कल्पना ... .... .... | १०२ |
| तूं आणि लोकभ्रम ... ... .... | १०२ |
| विरोधी प्रेम ... ... .... | १०३ |
| तुझें गान गावें कसें ? ... ... .... | १०४ |
| तूं आणि मायभू ... ... ... | १०५ |
| धिक् मां पुरुषम् ... ... ... | १०६ |
| शाश्वत सौन्दर्य ... ... ... | १०७ |
| सुकलेलें फूल ... ... ... | १०८ |
| दर्शन ... ... ... | १०९ |
| उत्कंठा ... ... .... | ११० |
| तुझें गान ... ... .... | १११ |
| राग ... .... .... | ११२ |
| तूं अज्ञात म्हणून ... .... .... | ११३ |
| अजब चीज ... .... .... | ११३ |

# आशा-गीत

४८३६
२१६५६ ता. १३.१.३६

# आशा-गीत

## शारदेस

[ चाल-आनंद कंद० ]

होतां स्मृती मनाला, आई तुझी जराशी
द्यायास भेट चित्ता, येतात सौख्य-राशी.
उत्तुंग या हवेल्या, हे भव्य राजवाडे
होतात नम्र माते, तव कीर्ति-मंदिराशी.
हे सूर्य चंद्र तारे, या वृक्षवल्लरीही
झाल्या तुझ्या प्रभावें, विश्वामधें विकासी.
मोहोर आम्रवृक्षा, संगीत कोकिळेला
आई, तुझ्यामुळें ये, सौंदर्य या उषेशी.
मानापमान मांडी, थैमान अंतरांत
तोही विरून जाई, तुझिया कृपाकटाक्षीं.
वाहे तुझ्या निवासें, वारा सदा सुखाचा
स्वर्गीय रूप वाटे, तूं आणिशी धरेशी.
हे काळ-दूत लोकीं, आहेत पांगलेले
त्या दूर घालवाया, अस्त्रें तुझ्याच पाशीं.
आप्तेष्ट मित्र सारे, सौख्यास भाळलेले
तल्लीन वाटतें कीं, व्हावें तुझ्या पदाशीं.

## चढ उतार

[ जाति–प्रणयप्रभा ]

चढ उतारावरी रम्यपणा
लाभला खरोखर या भुवना.
खालीं वर रवि येतो जातो
अस्तोदय रूपास आणितो
निरुपम शोभा नभास देतो
उच्च नीच रव सुख दे श्रवणा !
अथांग पसरे उदधी शांत
लहरी खालीं वर होतात
मधुर निर्मुनी दृश्य जलांत
हो सुखद तरी अस्थिर नयना !
उभीं पिकें शेतांत राहिलीं
वाऱ्यानें वर खालीं झालीं
अगाध शोभा त्यांत रंगली
ही वीज सरळ का लवतांना ?
मार्ग चढे डोंगर माथ्यावर
आणि दऱ्याखोऱ्यांतुन भूवर
वळण तयाचें वक्र मनोहर
का रुचिर भुजंग–प्रयात ना ?
'आद्यंता' स्वगुणीं जखडोनी
'वर्तमान' आसना घेउनी
झोके घेतो काळ निशिदिनीं
मार्गांत आणुनी मधुरपणा !

* * *

खालीं वर होण्याचें मिश्रण
जगांत म्हणजे सुरम्य जीवन
खिन्न जिवा हें ध्यानीं आणुन
यात्रेंत जगाच्या शिरतांना
दे अळण वळण अपुल्या चरणा !

२-७-२९

---

## टीकाकारास

[ सुनीत ]

हातीं घेउन पाहतोस जंव तूं स्नेहाळ दृष्टींतुन–
माझें काव्यलिखाण, तुच्छ गमतो तेव्हां मला स्वर्गही–
होतों शब्द तुझ्या मुखांतिल तदा ऐकावया आतुर
स्वर्गांतून रसातली बल तुझ्या वाणीमधें न्यावया.
टीका पाझरतां तुझी हळुहळू भासे सुधासिंचन
प्राशायास तियेस उत्सुक सदा मी होतसे चातक
कौशल्यें जंव दावितोस सहजीं काव्यातले मर्म तूं
हंसाशी करतोस काय मधुर स्पर्धा तदा भासते.
जेव्हां हृद्गत ओतितोस पुढती माझ्या भलें वा बुरें
सूत्राचे करितोस भास गमते जाळेंच तूं मोकळें
जें कांहीं दिसतील अल्प तुजला माझ्यामधें सद्गुण
दैवी तें समजून सौम्य वचनें उत्साह दे तूं मला.
माझ्या. आणि करामतींत दिसतां अक्षम्य कांहीं तुला
दावोनी निजभाव सूचक मला सन्मार्ग दावीव तूं !

१३-११-२७

---

# विश्वाच्या उपवनांत

[ चाल–झोका घेऊं ये ]

जीविताच्या उपवनीं ! प्रेमें रमूं या ॥ध्रु०॥
फुलें गोळा करूनिया
कांटे दूर सारूनिया
गोंजारीत कळ्या पानें बागीं फिरूं या.
पाखरांचा आला थवा
दूर देशांतून नवा
कवतूक पाहूं त्यांचें लांबूनच या.
फूलपाखरूं गोजिरें
मध चाखुनीया फिरें
वाट त्याची फिरायाची नीट करूं या.
दंवबिंदू पसरले
सूर्य-करांत शोभले
जागें नका करूं गाऊं अंगाई तया.
आल्या चिमण्या दाराशीं
गेल्या आपुल्या घराशीं
कोणाचें हें काय ?–होऊं कष्टी कासया !
गोड वाऱ्याची झुळूक
वाहूं लागे क्षण एक
पुढें मागें पाहूं नका तीस भेटाया.
करायाचें खुलें मन
करूं सुखांत हंसुन
झाले गेले भाव सारे गोड करूं या.

तुम्ही आम्ही भाऊ ताई
भेदभाव कांहीं नाहीं
जीविताच्या उपवनीं प्रेमें रमूं या !

२६-७-३०

---

## हे दीप लागले चोहिकडे

[ जाति–प्रणयप्रभा ]

हे दीप लागले चोहिकडे
अंधार कशाचा बोल पडे ?
असति न तारा या लुकलुकत्या
मिणमिणत्या वा जळत्या पणत्या
निरंजनांतिल वाती विझत्या
तळपतात हे तर सूर्य खडे
असेल सारें जग हें दुबळें
म्हणून तव मन निराश झालें !
उज्वल तव कां विचार सरले.
जणुं हिऱ्यामोतियांचेच सडे !
होउन अश्वावर तूं स्वार
साधाया जगिं येशि शिकार
' दिसें न सावज, ' उडव भरार
चौखुरावरी अपुले घोडे.

तीन हात तव नाहीं काया
नउ हात दिसे पडली छाया !
नसत्याची ही असती माया !
त्यामुळें तुझा कां जीव कढे ?
जा तूं आधीं काबिज गड कर
जरिपटक्यानें शोभिव मग शिर
तशांत उडलें राया ! तें तर–
तर तुला स्वर्गिचें राज्य घडे !
इन्दु दिसे ना कितीहि सुन्दर
एक पक्ष परि सोडी अंबर
भुलेल भुलणारें त्या अंतर
रविवीण परि न दिन एक घडे !
अंधार कशाचा बोल पडे ?

२७-४-२४

---

## धनवंतास

[ नोकरीवरून दूर झालेल्या एका नोकराचें उद्गार ]
[ चाल–घनःश्यामसुंदरा ]

धनवंता ! मज नको आसरा देऊं तुझिया घरीं
नको आणि तूं विंधू मजलां कटु शब्दांच्या शरीं !
वैभव तुजला जणूं वाटतें स्वर्गीचें उपवन
आम्हासम त्यामधें राबवुन घेसी दुबळे जन !
नाहीं परि तो देव दयाघन कुठें बरें लोपला ?
गरिबाचा छळ सगळा राया हा कळतो त्याजला.

* *

चिंध्या ज्या फाटक्या घालतो आम्ही अंगावर
ओवाळुन त्या टाकूं तुझिया थोर वैभवावर !
आम्हाला मखमलीहुनी ही राया प्रिय लक्तरें
मेजवानिचा थाट नको ही कांदाभाकर पुरें !
प्रौढीचीं भाषणें वाटती हीं तुज उपहासशी !
—हास, जिथें प्रभु कोपे तेथें करुणा येइल कशी !

*　　*　　*

धनास मोहुन तुझ्या; बोललों मातेला निष्ठुर
—नव्हे विषासम झेलायाला केवळ तव अंतर !
जिणें कंठणें –तिची थोरवी– पायधूळ वंदुन !
—तुला काय निर्दया ! थोरवी कळे तिची सांगुन !
तुझ्याच सहवासी मी माझ्या वृद्ध पित्याचें मन
निष्कारण टाकिलें कितीदां अदयपणें मोडुन !
शब्द दोन नच भावंडांशीं वदलों मी प्रेमळ
पैशाचा हा प्रभाव होता खेळ करित केवळ !

*　　*　　*

—असाच आतां रहा सुखानें नांदुन तूं जगभर
अस्तोदय पावती जोंवरी सूर्यचंद्र तोंवर !
विलास लक्ष्मी करीत राहो तुझिया सदनांतुन
आणि चिमकुल्या बाळांनीं तव गजबजुं दे अंगण !
चढव हवेल्यावरी हवेल्या एक एक वर वर
प्रासादावर आणिक अपुल्या भुलव सर्व सुरवर
रत्नखचित सिंहासन देई स्वतांच तूं थाटुन
सर्व ठेव धाकांत तेथुनी तूं अपुल्या त्रिभुवन !
असाच एके दिनीं सर्व गणगोत राज्य सोडुन
जा स्वर्लोकीं – परि दीनाचा आशिर्वच घेउन !

२१–४–१९२४

———

# शिवराज आणि बालवीर

[ 'मी परत येईपर्यंत या शिवेवरून तूं कोणाही स्वारास जाऊं देऊं नकोस' ही शिवबापासून मोठ्या कष्टानें मिळविलेली कामगिरी सावळ्या बजावीत आहे.]

[ केशवकरणी. ]

**सावळ्याः**—खबरदार जर टाच मारुनी जाल पुढें, चिंधड्या
उडविन राइ राइ एवढ्या !
कुण्या गांवचे पाटिल आपण कुठे चालला असें
शीव ही ओलांडुनि तीरसे ?
लगाम खेचा हा घोडीचा राव टांग टाकुनी
असे या तुम्ही खड्या अंगणीं !
पोर म्हणूनी हसण्यावारी वेळ नका नेउं ही
मला कां ओळखलें हो तुम्ही ?
हा मर्द मराठ्याचा मी बच्चा असे,
हें हाडहि माझें लेचेपेचें नसे
या नसानसांतुन हिंमतबाजी वसे
खबरदार जर टांच मारुनी जाल पुढें, चिंधड्या
उडविन राइ राइ एवढ्या !

**स्वारः**— मळ्यांत जाउन मोटेचें तें पाणि धरावें तुवां
कशाला ताठा तुज हा हवा ?
मुठींत ज्याच्या मूठ असे ही खड्गाची तो बरें
वीर तूं समजलास काय रे ?
थोर मारसी अशा बढाया पराक्रमाच्या जरी
कुठे तव भाला बिरचा तरी ?
हें खड्गाचें बघ पातें किति चमकतें
अणकुचीदार अति भाल्याचें टोंक तें

यापुढें तुझी वद हिंमत कां राहते
खबरदार जर पाऊल पुढे टाकशील चिंधड्या—
उडविन राइ राइ एवढ्या

सावळ्याः-- आपण मोठे दाढीवाले अहा वीर बायकी
किती ते आम्हाला ठाउकी !
तडफ आमुच्या शिवबाजींची तुम्हा माहिती न कां ?
दावितां फुशारकी कां फुका ?
तुम्हासारखे असतील किती लोळविले नरमजी
आमुच्या शिवबानें भररणीं
मी असे इमानी चेला त्यांचेकडे—
हुकमाविण त्यांच्या समजा याचेपुढे
देईन न जाऊं शूर वीर फाकडे.
पुन्हां सांगतो खबरदार जर जाल पुढें चिंधड्या
उडविन राइ राइ एवढ्या

× × ×

लाल भडक तें वदन जाहलें बाळाचें मग कसें
(स्वार परि मनी हळूं कां हसे ?)
त्या बाळाच्या नयनीं चमके पाणी त्वेषामुळें
स्वार परि सौम्य दृष्टिनें खुले.
चंद्र दिसे एक जणूं दुसरा तपतो रवि का तर
ऐका शिवबाचे हे स्वर
आहेस इमानी माझा चेला खरा,
चल इनाम घे हा माझा शेला तुला
पण बोल सावळ्या पुन्हां बोल एकदां
खबरदार जर टाच मारुनी जाल पुढे, चिंधड्या
उडविन राइ राइ एवढ्या !

४-११-२२

——

# बाल लीला

[ आनंद कंद० ]

दावीव आपुल्या तूं बाळा सुरम्य लीला
आनंद मन्मनाला द्यायास या क्षणाला
काळ्या विशाल नेत्रीं तूं हे कटाक्ष फेक
गोऱ्या फुगीर गालीं पाडी खळी सुरेख
दावून दंतपंक्ती हास्यामुळें सलील
कंठांत गंधवाही तूं कुंदमाळ घाल
वाजीव गोड हातें तूं स्पष्ट एक टाळी
लाटा प्रसन्नतेच्या निर्मून अंतराळीं
दे छंद पाउलांना स्वच्छंद नाचण्याचा
येवो तुझ्या स्वरूपें श्रीकृष्ण गोकुळींचा
ये रान पांखरांचा मेळा जमून दारीं
बोलींत बोबड्या तूं त्यांच्यांत हो विहारी
हातांत लांब काठी हो स्वार तीवरी तूं
त्वेषें शिवापरी ने सर्वत्र शौर्य-केतू
दे कष्ट भूस जेव्हां तापामुळें उन्हाळा
तूं गोड वायुवीची होतोस तीस बाळा
आला वसंत, झाले सारें प्रफुल्ल रान
क्रीडेमुळें तुझ्या रे सर्वांस सौख्य–पान
गाऊन तत्त्वगीतें ये वैखरीस शीण
आलेखितां तुझ्या ती नांवास हो नवीन
जें सत्यपर्व लोकीं होणार बोलतात
तूं भाससी तयाचा कीं आद्य-देव-दूत.

१-८-२९

---

# निवडुंगाचें गाणें

[वडाभोंवतीं चौफेर माजलेलें निवडुंग आपल्या परिस्थितींत समाधानानें राहातें; तरी मनुष्य त्याचा नाश करतो.]

माळाच्या पायालगतीं—गांवाच्या शेजेभंवतीं,
अफाट दुनिया वास न करिते, चुकून पाही ना जेथें
आनंदाची फुगडी धरुनी—करितों आम्ही खेळ तिथें.

सृष्टीचे असती फार—वट पिंपळ राजे थोर
ते तर अमुचे देव, तयांचे— केवल आम्ही दास असूं.
चौफेर अशी सेना पसरुनि—सदैव त्यांना रक्षितसूं.

हिरवीं झुडुपें इवलालीं—राजांच्या पायाजवळीं
भाट होउनी वैभवगाणीं—अक्षय त्यांचीं गातात.
पक्षीगणही धरुन डहाळ्या—सांथ तयांना देतात.

मोठे ओहळ येताती—भेटहि एकादी देती
झुळझुळ मंजुळ गात पाऊलें, मोदें अमुचीं भिजवीत
फळाफुलांच्या परड्या आम्ही, वाहतसूं त्या थाटांत.

रूप बघुन अमुचें साधें—वनराई गाई मोदें.
मोठेमोठे वनराज परी—राहति आम्हां सोडून
अंतर ज्यांचें सदैव असतें, कुरूप परि अमुच्याहून.

दमले थकलेले प्राणी—अमुच्या राज्याजवळोनी
जाती जे त्या मधुर फलें हीं, आम्ही देतों हर्षूनी
देव आमुचें आनंदें ही, निर्हेतुक बघती करणी.

वैभव हें बघुनी अमुचें—वैरी अमुच्या जन्माचे
अमुच्या राज्यीं शिरुनी करिती, अकांडतांडव भयंकर
दुबळ्या माना अमुच्या त्यावर—चालविती शस्त्रें थोर.

---

# खेड्यांतील आनंद

[ वृत्त–दिंडी ]

फुटे क्षितिजीं तांबडें जों न थोडें
तोंच जागें होतसे सर्व खेडें
तरुण आखाड्याकडे धांव घेती
वृद्ध भूपाळ्या प्रभुस आळवीती.
उठुनि गृहिणी लगबगा अंगणांत
सडा संमार्जन करित राहतात
आणि वृंदावन कुणी परसदारीं
नम्रभावें साष्टांग नमस्कारीं.
सान थोरांना समय पहाटेचा
असा वाटे उत्साह उमेदीचा
मीहि मिळुनी त्यांच्यांत गमें जावें
आणि सौख्यीं त्या भागिदार व्हावें.

* * *

सूर्य माध्यान्हावरी चढत आहे
पूर्ण शांती खेड्यांत नांदताहे.
गांव शीवेच्या वृक्ष-साउलीस
बसे कोणी पांथस्थ विसाव्यास.
निघे पाण्यावर गुराबासरांचा
थवा येई वर लोट तो धुळीचा
नाद कानावर पडे घुंगरांचा
सूर मिसळे त्यामधें पावरीचा !

मोट सुटली, मोकळे बैल झाले
गडी सारे एकत्र जमुन आले
बसुन पाटाच्या वाहत्या कडेला
सोडुं आतां लागले न्याहरीला.
सान थोरांना समय शांततेचा
असा वाटे हा गोड विसाव्याचा
मीहि वाटे त्यांच्यांत मिळुन जावें
आणि सौख्यीं त्या भागिदार व्हावें !

* * *

ऊन पसरे कोंवळे सोनियाचें
कळस पिवळे शोभती देवळांचे
थवा आकाशीं उडे पाखरांचा
मार्ग धरुनी आपुल्या कोटरांचा.
दावणीशी वासरें ओढ घ्याया
आणि आतां लागली हंबराया !
सांज झालेली सुटे मंदवात
घरामधुनी लागेल सांजवात.
समय सर्वांना हाच विसाव्याचा
एकमेकांना सुखें भेटण्याचा
मीहि वाटे त्यांच्यांत मिळुन जावें
आणि सौख्यीं त्या भागीदार व्हावें.

१५-१-२७

# शांतिपाठ आणि आक्षेप

[ जाति–मुद्रिका ]

या बांधव आतां जमून सारेजण
आळवूं एकभावानें श्री जगदीशा आपण
लाभले उच्चकुल–जनन तया वानुनी
कां निंद्यवचें ताडावें अन्यास नीच मानुनी ?
घे फत्तर हातीं जाणुन उज्ज्वल हिरा
चेष्टेस या न वेड्याच्या हांसणें उचित हो जरा !
नवनवे इंद्रधनु रंग दावि लोचना
हे तुषार कारंजाचे स्थळिं उगमाच्या एक ना ?
वैशिष्ट्य भिन्न धर्मांत ईश दाखवी
ही कृती समंजस त्याची विश्वांत वैर माजवी !
पेटून घातकी अभिमानाला बळें
हक्कास्तव भू-मातेला पीडितां अनन्वित छळें !
पिकलें फळ येइल निसर्गतः भूवरीं
कृत्रिमता वरुनि कशाला हिरवेंच विंधितां शरीं ?
कां वातावरणा मर्यादा घालितां ?
मृगजळास सत्य जळाचें हें रूप देउं पाहतां !
घालितां दुजाच्या गळ्यांत अपुला गळा
कां परात्पराच्या बोला नुठतात मुखीं स्मितकळा ?
संध्येस निशा अरुणास उषा भेटतां
भूमाय न आनंदानें डोलतें काय तत्त्वता ?
घ्यावोत सर्व जन शांतिपाठ भूवरी
रामराज्य गाया देवा दे संधि मला लौकरी.

**आक्षेपकः** – गाऊन नका दाखवूं शांतिपाठ हा
ठाऊक असें आम्हाला आहांत किती ठक महा!
आम्हास बकाचें ध्यान पुरें माहिती
निर्व्याज कोवळें प्राणी गातील तुम्हा आरती!
कष्टून अर्धपोटानें पिकवूं मळे
पीक तें तुम्ही नेणारे कापून आमुचे गळे!
वडिलार्जित होता जमीनजुमला भला
तो तुम्हा शांतिपाठानें कां कायमचा लाभला?
हें पोर उपाशी मांडीवरती मरे
गोड या नीतितत्त्वानें कां पोट तयाचे भरे?
गिरिवरी उभे राहुनी शिंग फुंकितां
दडलोंत सत्तपाताळीं ही दूर करा बधिरता!
ठेवितां तऱ्हा पोषाखाची नेटकी
ही भाषणबंदी आधीं स्वीकरा तुम्ही नाटकी
जाहला रक्तबंबाळ देह हा पुरा
त्यावरी नका ही टाकूं कटु लवणरूप शर्करा!

* * *

घ्या करीं आमुच्या परी कुदळ फावडे
तेव्हांच गोड शांतीचे आम्हास गीत आवडे!

२१-१-१९३०

# निर्वाणीचा सवाल

[ चालः—घनःशाम सुंदरा ]

अधिकाधिक शोभीव ईश्वरा अपुलें नंदनवन
गरिबाची झोपडी परी कां टाकिसि तूं जाळुन ?
चंद्रसूर्य हे दीप महालीं सतत ठेव तेवत
मिणमिणती पण पणती माझी मालवसी कां वद ?
भर जरतारी वसन नर्मीचें घे जा तूं तनुवरी
अंगावर चिंध्या न फाटक्या खपती तुज कां परी ?
सुरांगनांच्या सवें रहा तूं नाचत रात्रंदिन
आप्तेष्टांशीं मला न देशी बोलूं कां भाषण ?
मला ठाऊकी आहे देवा असशि दयेचा घन
वर्षुं नको मजवरी—काढसी जल कां नेत्रांतुन ?
झडोत दारीं तुझ्या चौघडे विजयाचे ईश्वरा
परी धाडुनी देशी कां तूं अपयश माझ्या घरा ?
अमर सदासर्वदा त्रिभुवनीं रहा प्रभो ! होउन
मृत्यु लाडका परि कां माझा मित्र घेसि ओढुन ?
भूपाळ्या तूं ऐक सकाळीं भक्तांच्या रंजुन
गुणगुणतां मी परी स्वतांशीं धरसी कां अडवुन ?
सद्विचार भांडार ठेव तूं माझ्या पासुन दुरी
कुविचारांचें काहुर परि कां माजविसी अंतरीं ?

* * *

निर्वाणीचा सवाल देवा मोक्ष न दे मज कधीं
परंतु कां शिर असें तुडविसी तुझ्या ठेवितां पदीं ?

१२-११-२४

# माझी आवड

[ वृत्त–आनंद कंद ]

व्योमीं निरभ्र शोभा
नेत्रा असह्य होई
व्यापांत तें ग्रहांच्या
चित्तास सौख्यदायी.

एकांत निर्जनीचा
संतापवी जिवाला
त्या क्रूर श्वापदांची
नाहीं जयांत लीला.

कोणा विशुद्ध रंगीं
आनंद दिव्य लाभो
त्या इंद्रचापरंगीं
मच्चित्त नित्य राहो.

देवास निर्विकारी
स्वर्गीं मिळो निवास
चांचल्य जीवितांचें—
देई मला सुखास.

निश्चिंत मानसाचा
उद्वेग चित्तिं वागे
क्षोभामधें तयाच्या
सौख्यांत मी तरंगें.

२२-२-१९३०

# मायावती

[ कवीस एखादी अलौकिक कल्पना सुचली म्हणजे तो ती शब्दांत व्यक्त करितो. हें दिव्य त्याला नेहमींच साधतें असें नाहीं. ]

[ जाति–प्रणयप्रभा ]

मोहास तुझ्या मी पडुन बळी
अज्ञात कुठें पातलों स्थळीं !
मायावी तरि जें दृग्गोचर
हृदयंगम तरि जें क्षणभंगुर
इंद्रचाप वा मृगजल भूधर
अव्यक्त तुझी अविनाश-कळी
गे निराधार जागीं फुलली.
अद्‌भुत तूं तुज अद्‌भुत नेत्रें
पहावया पाहिजेत गात्रें
अद्‌भुत गायन अद्‌भुत मंत्रें
पाहिजे कराया तुझें मुळी
मोहास कसा मी पडे बळी !
शांतीचें साम्राज्य चालतें
भूवरतीं वारें न हालतें
स्थिरचर निद्रेमधें रंगतें
सोडून रम्य तेथली स्थली
पातलों इथें मी अवकालीं !
प्रिय माझे तेथें सुतकांता
टाकुन सेवाया एकांता
–क्षण विरहें करतिल आकांता–

पातलों पडत मी तुझ्या गळीं,
पण तुला दया ये का न मुळी ?
खुणाविशी मज वरवर नेसी
प्रकट करुनि ना रूप दाविसी
—ध्यास मला ज्याचा चित्तासी—
कीं गाउन तें मी भूमितलीं
राहीन जनीं अक्षयकालीं.
वदन जवळ कानासी घेसी
अद्भुत बोलूं जरा पाहसी
अस्पष्ट तुझ्या वच—वेलीसी
का चिकटुन राहे अर्थ-कळी ?
उघड, ना टाक संभ्रमानलीं.
मी आहें प्राणी जड भारी
चपलेचे तव वल्हें स्व-करीं
वायूची तुज लाभली तरी
गति तुझ्यापुढें माझी भ्रमली
का निराश परतूं निजस्थलीं !

*　　　　*　　　　*

पदतलिं ये शुक्राचा तारा
सुटे गार अति पहाट—वारा
निसटुन तूं गेलीस भरारा !
मधुर कीं स्वप्नतति मनांतली
सोडून मला जड भूमितलीं !

३१–७–१९२९

# काय तरि केला अपराध ?

[चाल–भाव धरारे]

काय तरि केला—अपराध असा मी बोला ?
घरांत यावें शांती नाहीं
दारीं जावें शांती नाहीं
एकांतीही शांती नाहीं
काय तरि केला—अपराध असा मी बोला ?

दुःखी कष्टी घरांत यावें
माउलीस दुःखांत पहावें
आपण अपुलें दुःख गिळावें
काय तरि केला—अपराध असा मी बोला ?

परमेशानें स्थिती दिली जी
तींत असें मी सदैव राजी
उपहास करी जनता प्रभुजी
काय तरि केला—अपराध असा मी बोला ?

आदर वाटे गुणी जनांचा
सहवास गमे व्हावा त्यांचा
करिती परि मज दूर सदाचा
काय तरि केला—अपराध असा मी बोला ?

निसर्गातली प्रभुची लीला
लाभे न मुभा पहावयाला
पराधीनता इतुकी मजला
काय तरि केला—अपराध असा मी बोला ?

कर्तव्य करायास्तव जावें
अस्थिर परि हें चित्त असावें
विपरीतच कांहीं तरि व्हावें
काय तरि केला – अपराध असा मी बोला !
झालें होणारें विसरोनी
लागावें जरि तुमच्या ध्यानीं
प्रभु देतां मज दूर लोटुनी
काय तरि केला – अपराध असा मी बोला

१–११–२२

## भयचकित हरीण !

[ जाति–मोहिनी ]

मृगा ! तुझें बावरलेलें मोद दे स्वरूप
बघुन तुला नूतन येतो जीवितीं हुरूप ॥ ध्रु० ॥
नसे व्याध मागें कोणी तुझ्या लागलेला
लुप्त मार्ग तुझिया पुढचा हिरवळींत झाला.
रानमाळ हिंस्रपशूनीं नसे व्यापिलेला
स्वैर वागडून लुटावें सौख्य तूं अमूप !
पवन–लहर गवतामध्यें संचरे सुखानें
गगनपथीं मधुनी उडतो विहग गात गाणें
साथ तया खळखळ नादें दिली निर्झरानें
तुला यांत केवि दिसावें भयद सांग रूप ?
काव्यविषय अस्थिरवृत्ती तुझी भूतळाला
खंत तुला पुढची किंवा मागची कशाला ?
ईश तुझ्या रूपें देतो धीर मन्मनाला —
जाळ भयद आभासाचें पावतें विलोप !

१३–१२–२९

# आवाहन

[ चाल–आनंदीआनंद )

आवड तुज इतिहासाची – गतकालीं विहरायाची
तन्मय तेथें होउन तूं – काढ जुन्या शोधुन वस्तू
स्ववलें पण दास्यांतून – जे आले वर धावून
सुयशाचे ध्वज रोवून – दिगंत गेले उजळून.
उदात्त चरितें वीरांची – स्फूर्तीची उत्साहाची
तीं दाउन निज राष्ट्राला – संजीवन अर्पायाला
देशोद्धारास्तव तूर्ण – ये तरुणा सरसावून.

*　　*　　*

गोडी तुज अध्यात्माची – जीवभाव जाणायाची
तूं तेथें हो तल्लीन – सांग नवे संदेश पण —
भाव आपपर झुगारुनी – हृदय खुलें अपुलें करुनी
एकामेकांच्या कंठीं – कंठ दिले प्रेमासाठी.
ते पूर्वज अपुले थोर – जे दीनांचे आधार
प्रेमळ ते त्यांचे भाव – अज्ञ जनांना तूं दाव
हे सर्व तुझे मग भाऊ – 'चला एक आपण होऊं'
घोष थोर हा करतील – देशोद्धारा झटतील.

*　　*　　*

काव्य शास्त्र आणि विनोद – याचा तुज लागे नाद
हो तूं तन्मय त्यापायीं – एक तुला विनती पण ही—
स्वधर्मनिष्ठा राखून – गाउन ऊर्जस्वल गान
जे गेले संत हरून – राष्ट्राचे पंचप्राण
ती त्यांची मधुरावाणी – मृतास कीं मधु निर्झरणी.

खेळव तूं राष्ट्रांतून – हालव जन निद्रामग्न
देशोद्धारास्तव अंतीं – कलावंत तूं ये पुढती.

* * *

आणिकही तरुणा चार – स्वमतें धंदे स्वीकार
त्यांतच तूं हो तल्लीन – ध्यानीं पण इतुकें आण
वंदुनि ज्या भूजननीचे पद – गेले आजेपणजे
कूस आणि कष्टवुनी जी – नित्य काळजी करी तुझी.
पुढे तुझे नातू पणतू – ठेवितील जीवर हेतू
जन्मभूमि ती पूज्य तुझी – खचली परवशतेमाजीं
सावध होउन तर तरुणा – धाव तिच्या तू उद्धरणा.

२१-१-२७

---

## अवसानघात

वाट उषेची बघतां तिष्ठत
मध्यरात्र कंठिलीं
उषःकाल पातला गाढ मज
झोप पुढें लागली !
रानमाळ कांटेरी तुडवित
भू रुचिरा शोधिली
अकस्मात बांधावर माझी
पदेंच रेंगाळलीं !
ठाव तुझा लावाया प्रभुजी
आजवरी भागलों
सन्निध येतां एकाकी पण
वेडा अजि जाहलों.

१७-८-२९

---

# स्वप्नांत काय पाहिलें ?

[ जाति–पर्वती ]

स्वप्नांत असें पाहिलें,
कीं विकायास काढिलें,
भरतभूमिला, धवल जिचें यश नवल जगा जाहलें !
मग पांची खंडांतुनी,
हे घुमूं लागले ध्वनी,
" भारतभूचें वैभव येऊं चला विकत घेउनी ! "
पूर्वेस देश लोटले,
बल घेउन आपापलें,
हिमालयापासुन लंकेवर ठाण जयीं मांडिलें !

* * *

बंगाल कुणी पाहिला ?
वाघ जो तया भासला,
दिल्लीचा तर थाटमाट मनिं कोणाच्या उतरला ?
काश्मीर निसर्गांतला,
भूपती कुणा वाटला,
मोल तयाचें ठरवाया कुणि तळहातीं झेलिला !
राजपुताना पाहुनी,
छाती गेली दडपुनी,
भयभीत तसे कितीक झाले पानपताच्या रणीं !
धवलगिरी उल्लंघुनी,
कांचनगंगेला कुणी,
एकसारखी आतुरतेनें मग केली मागणी !

गंगा-यमुना पाहुनी,
मनिं गेले ते मोहुनी,
सातपुडा, विंध्याद्रि लागले ओलांडाया कुणी !
कोणाच्या दृष्टीपुढें,
ते सह्याद्रीचे कडे,
एकसारखे नाचुं लागले, विस्मयांत जग बुडे !
ही महाराष्ट्रभू, तर–
तें कुणास तंजावर,
म्हैसूर कुणां रुचे, मान्य हो कुणास रामेश्वर !

* * *

दुंदुभी–नाद थोरला,
व्हावया तोंच लागला,
गडगडतां ढग आनंद गमे, मयूरास जाहला !
व्हावया घोष लागले,
एकेक देश चालले,
कुबेरधन सारखें रितें मग तिथें होउं लागलें !
बंगाल चालला पहा,
पेशावर कोणा हवा ?
सह्याद्रीचें मोल काय ? लागले बोल यावया !

* * *

सारखे देश चालले,
मग सर्वांनीं पाहिलें,
महाराष्ट्र-भूकडे; पुढें पण नवल थोर वर्तलें !

हा विक्रमशाली हवा,
कोणास देश का पहा ?
मोल असे याचें पण भारी यूरोप अमेरिका !
मग चढाओढ लागली,
किंमत त्याची वाढली,
पांचीं खंडावरती त्याची तुलना तों चालली !
'एकवार' गेला पहा,
कीं देश 'दोनवार' हा !
'तीनवार'...उमटतांच वच हें विस्मय झालें महा !

× ×

देवता कुणी येउनी,
चालली सर्वे घेउनी,
हिन्दभूमिला—' खालीं गेला प्रलयकाल होउनी ! '

# पाळणा

तान्हुल्या बाळा ! वाजीव वाळा
हातापायाचा चालीव चाळा
स्वैर खेळाया आनंदपाळा
प्रेमाचा घे हा झोका वेल्हाळा
जो जो रे जो जो.

उडते बागडते केश हे कुरळे
फिरते बावरते सतेज डोळे
भाळीं नभींचा चांद झळाळे
लागेल बाळा दृष्ट न कळे
जो जो रे जो जो.

कोवळ्या पिवळ्या सायंकिरणांचा
'सोन्याचा' माझ्या साज सोन्याचा
नभांगणाच्या शुभ तारकांचा
शोभे कटीला गोफ बाळाचा
जो जो रे जो जो.

टाकीन अशी मी ओवाळून
त्रिभुवनें हीं बाळावरून
वन्सीधर हा जीवाचा चांद
पुरवीन याचे मी छंद फंद
जो जो रे जो जो.

# खेड्यांतील घराकडे

[ मोठ्या उत्सुकतेनें शहरवासी विद्यार्थी आपल्या खेड्यांतील घराकडे जात आहे—]

[ केशवकरणी ]

खुणा गांवच्या दिसूं लागल्या स्पष्ट मला लोचनीं
उडे किति खळबळ हृदयांतुनीं.
देशमुखांचीं हिरवीं सुंदर शेतें हीं शोभतीं
वाडगीं त्यांत दिसूं लागतीं.
माळावर पातलों लागला दिसूं गांव–कोस हा
काय तरि मौज कथूं ही पहा !
ही चोंहिकडे पसरली दिसे हिरवळ
तें लांब दूरवर नदिचें जल निश्चल
हे कळस अलिकडे देवीचें देउळ
वट–पिंपळ ते आणिक दुसरी शोभे वृक्षावली
त्यांत तीं घरें गडप जाहलीं.
गुरें वासरें दिसूं लागलीं चरतांना या इथें
गुराखी तसे तयामागुतें.
बाळपणीचे मित्र यामधें असतिल माझे किती
दृष्टिहि आश्चर्यें लाविती.
किती आदरें खुल्या दिलानें मजकडेच धावती
रीत ही प्रेमळ यांची किती !
"काय राव होता शहरामधिं किति दिन
खबरबात आम्हा सम्दी द्या सांगुन"
–हीं गोड भाषणें त्यांच्यांतिल ऐकुन

मोठ्या प्रेमानें मी त्यांचा निरोप तो घेउनी
चाललों पहा पुढें हर्षुनी.
एक टाकितां पाउल पुढती हृदय मुदें हें उडे
त्यांत ही विचारावली उठे.
जायाचें हळु परसाच्या त्या मागिल दारांतुनी
कसें सर्वांनाही चुकवुनी.
असतिल ताई भाऊ खेळत 'इप्पि' तिथें अंगणीं
मौज मी देइन ही उडवुनी !
मी चोरचोरुनी मागुति हळुं जाइन
तो सागरगोटा वरचेवर झेलिन
आश्चर्यें बघतिल वरती सारे जण
माउलीस मग थक्क कराया आम्ही जाऊं कसें
धूम ती धाव घेउनी तसें.
बघतां बघतां मारुतिचें हें देवालय लागलें
किती परि चंचल मन जाहलें.
चांफा दिसतो स्पष्ट आमुच्या येथुन परसांतला
पहा किति उंच तरी वाढला !
माळवदावर उभे राहुनी अरे परन्तू असें
पाहतें मजकडेच कोणसें !
हं– कळलें– ही तर माझी ताई गडे !
किति रोखुन टाकी दृष्टी ही मजकडे
घाईंत सांगण्या गेली आईकडे.
दारीं येइल अतां माउली ओवाळाया मला
पूर्वींचा बेत विफल जाहला !

३-११-२२

## तीव्र उन्हाळा

[ जाति – अवनी ]

सहन आज होत नसे तीव्र हा उन्हाळा !
शीतळ दे छाया मज करुनि लोकपाळा.

लौकिकास येत मान
स्तुत्य होत बाह्य वाण
हृदय न येथें प्रमाण
बकहि हंस झाला !

कंठाची आणभाक
प्रियजन घेती अनेक
फास लाविती विशंक
भुलुनि परधनाला !

न्यायाचें मधुमोहळ
जनविपिनीं दिसत विरळ
वश करितां दंशानल
झोंबतो तनूला !

तप्त वाळवंटांतुन
निजकर्तव्या जागुन
चालावें मात्र बघुन
ध्येयमृगजळाला !

वीणेची तार तुटे
काचेला जाति तडे
हृदय न कापूस उडे
जणूं पिंजलेला !

करण्याला आत्मघात
चित्त अधिर फार होत
आकांक्षा विफल जात
धैर्य ना तयाला !
पंजरांत जीवविहग
रात्रंदिन करि तगमग
भेट तया दे लगबग
मुक्त कर दयाळा !

३-११-२९

---

## भग्नजीवन

अधःपात खडकावरतीं
होतसे जळाचा
उद्भवली त्यांतुन माला
रम्य तुषारांची.
तीच वैभवश्री अमुची
जगा दिसायाची
दुजा हेतु नाहीं अमुच्या
भग्न जीवनाचा !

२९-४-२९

---

# लाभुं दे तुझी मज पडछाया !

[ जाति – प्रणयप्रभा ]

लाभुं दे तुझी मज पडछाया
कर दीनावर या थोर दया.
मूर्त रूप तव पहावयाची
आकांक्षा नुरली चित्ताची
अस्पष्ट तुझ्या आभासाची
लागली एक इच्छा हृदया
रे ! तडीस ने ती तूं सदया.
तिन्हीकाळ बसतात जिव्हारीं
संसृतिच्या या कठिण कुठारी
झालों मी पाषाण अंतरीं
ही किसलयाहुनी मृदुकाया
मी कशी तुझी स्पर्शूं राया ?
गुरें वासरें भर-माध्यान्हीं
आहोंव मुखीं फेस गाळुनी
प्राण वसे कंठांत येउनी
दाखीव तयांना तरुछाया
एवढी कृपा कर तूं सदया !

---

२१२६६ ३३
१३१६ नां. दि: ३.११.३.१.६०

# कल्पना आणि ध्येय

[ ध्येयाचें संपादन कल्पना करून होत नाहीं. प्राप्त परिस्थितीचा सुखोपभोग घेण्यांत तें खरें हातीं येतें. ]

[ जाति–मोहिनी ]

कितो वेळ फेकित राहूं कल्पनातरंग
कधीं तुझें समजायाचें सांग अंतरंग ?
पुष्पहार सुकला त्याचा दरवळे सुवास
तुझा ठाव शोधित राहे फिरत दशदिशास
तोहि कुठें विरुनी जाई कळेना मनास,
आणि भरुनि चित्तीं राहे शून्यता अथांग !
निघे तरल कंठामधुनी आर्त जी लकेर
गिरी दरी घुमवित शोधी तुला करित फेर,
तीहि विफल कर्णीं माझ्या परतते अखेर
अंधकारपटलीं होतो जीव फिरुनि दंग.
बाह्य अतां संवेदनही तनूला कळेना,
निर्विकारचित्तीं प्रतिमा कशाची हलेना
शब्दरूप भासहि अथवा मनीं आकळेना
शून्यांत न या सामावे रूप तव अनंग.

× × ×

वनांतील माळा आतां गळा घालितें मी
स्वतां आणि रिझवित बसतें गीत गात नामी
चरांचरांतिल वस्तूंच्या रमत सुखारामीं—
शोधिलें तुला नवलाचा जाहला प्रसंग !

३–४–३०

---

# पूर्वस्मृति

[ वृत्त – वसंत ]

महाराष्ट्रा ! तुझ्या देहीं स्फुरो दे, पूर्वचैतन्य
यशोगानीं तुझ्या होवो सदा माझी गिरा धन्य,
उभा पाठीस राखाया तुझा जो बंधु सह्याद्रि
तयाला गीत गायाची सुखें लागो जरा तंद्री !
पहा नेत्रापुढें त्याच्या शिवाजी आणि तान्हाजी
पुन्हां येतील फेंकाया प्रतापी आपुले वाजी,
हराया तक्त दिल्लीचें कराया मुक्त भूबाला
स्फुरू लागेल तेजस्वी मराठ्यांचा पुन्हां भाला !
स्वधर्माचा तिन्हीं लोकीं पुन्हां राखावया मान
पुढें येईल संभाजी कराया मान कुर्बान !
धनाजी आणि संताजी सुखाची सोडुनि शेज
वराया स्वामिभक्तीचा पुन्हां येतील तो साज !
सुटे भीमेहुनि वारू थडी गांठील ' गंगेची '
सुरूं होईल ती स्वारी पुन्हां श्रीबाजिरायाची !
मराठेशाहिचा न्याया दरारा उत्तरेमाजीं
दिसूं लागेल शौर्याची भरारी शूर दादाची !
प्रतापी बालवीरांचा महाराष्ट्रामधें वास
असा संदेश सांगाया पुढे येईल विश्वास !
स्वराष्ट्राची अकाली जी कलाया लागली वेस
धडाडी माधवाची तों तिला तारील सावेश !
सजे स्वातंत्र्यभानू जो बुडाया पश्चिमाब्धींत
धजे बापू स्वदेहाचें कराया दान यज्ञांत !
अशी दिव्यें करायाला वराया मृत्यु वीरांचा
पुन्हा हा शूर सह्याद्री कधीं लोकीं उठायाचा ?

# शिवप्रभूचें गान

[ चाल – दोह्याची ]

१

निरभ्र आकाशांत फिरे सहर्ष कीं शशिराज,
प्रशांत कासारीं डोले प्रफुल्ल काय सरोज ?
निर्मल हृदयीं विहराया आले वा सुविचार,
सुंदर नंदनवनांत कीं सुर करिती संचार
विश्रांतींतच लाभे कीं, पवनलहर हळुवार,
शांत अंतरात्मा डोले कीं ब्रह्मानंदांत.

* * *

महाराष्ट्र – देशीं झाला ' शिवप्रभू 'चा वास,
उषःकाल होई वाटे कीं, सायंसमयास.

२

देहाला आत्मा किंवा पुष्पालागिं सुवास,
भगीरथाचे गंगेच्या अवतारा सायास.
यशोदुंदुभीनादाला विक्रम किंवा थाप,
अंतरंगसौंदर्याला मन अथवा निष्पाप.
ध्यान जणूं योग्याला कीं, ईशवास भक्तास,
स्वर्गाला नंदनवन वा वज्र जसें इंद्रास !

* * *

महाराष्ट्रनामा साजे शिवप्रभूची जोड
दिवसाला नाहीं जैशी सूर्यावांचुन तोड !

७–१२–२६

# अरुण

[ जाति – चन्द्रकान्त ]

दुःख संपलें सौख्य हरपलें विरक्तता आली
स्थिती हीच कां क्षितिजीं दावी अरुणाची लाली.
व्याप न मागें परी न लाभे चित्तीं एकांत
संभ्रम नुरला परंतु विलया संदेह न जात.
द्वैत नुरे पण अद्वैताचा लागे ना ठाव
सगुणावरची निष्ठा ढळली निर्गुणीं न भाव.
थोडक्यांत वाटते न गोडी रुचे न अतिरेक
परार्धीं न राहिली मौज परि शून्य गमे एक.
हवें नकोसें झालें वाटे प्रिय अप्रिय चित्तीं
सान्निध केलें दूर न येई पलीकडिल हातीं.
व्यवहारांतुन लक्ष उडालें तत्त्व गमें खोटें
सरळपणा सोडिला न होई प्रिय पण उफराटें.
अर्थाठायीं अनर्थ, गमती विफल सत्य बोल.
अस्तित्वीं सौंदर्य न, झालें नसतेंही फोल.
मूळ तुटे पण सुटे न शेवट भावतरू असला
मूर्तरूप कीं क्षितिजीं घेउन भासमान झाला.

* * *

प्रलयकाल संपला पावलें रामराज्य नाहीं
अनिर्वाच्य कीं काल मधें हा दृग्गोचर होई ?
व्याप दिनाचा आणिक अवघ्या रजनीची शांती
एकासमयावच्छेदें कीं पावतात मुक्ती ?

दो पक्षाचें युद्ध संपलें मधली तडजोड
व्हायाची राहिली काल का मधला हा गोड ?
आचारविचारांची केली पूर्ण वजाबाकी
अंतीं त्यांतुन काय राहिला शून्यपणा बाकी ?
गतभावी कालामधली ही तरल काय रेषा ?
गूढ आणखी प्रकट यांतली किंवा परिभाषा ?
विश्वाचें आद्यंत पावलें मध्यरूप काय ?
चिच्छक्तीला कीं ही भेटे मायेचीमाय ?

* * *

इहलोकीच्या परलोकीच्या मधली पळवाट
स्तिमितजगाला क्षणैक देऊन जाते कीं भेट !

# अनुताप

[ जाति – मुद्रिका ]

हा तरुण वृद्ध वा आणुं नको निजमनीं
ने घरा प्रभो ! हा प्राणी जो हतबल जीवितरणीं.
तनुधनास नव्हते मला कांहिही उणें
उधळितां स्वैर व्याधींचीं पाठीस लागलीं ऋणें.
मजपुढें बद्धकर सुमतिसती राहिली
नेणून महति मूढानें मनसोक्त तिला ताडिली.
शब्दचाप होतें मुखीं सहज लाधलें
निर्व्याज सुहृदविहगांचे मी वृथा वृंद विंधिलें.
उपचार रम्य ठेवून समाजामधें
अज्ञात निंद्यकृत्यांची गोविली मालिका मुदें.
जरि सुवर्णयुत पात्रास मुलामा दिला
रंग का निकस धातूला चिरकाल तसा राहिला !
गत - काल - चित्र राहतां दृष्टिच्यापुढें
अंतरंग अनुतापाच्या सरितेंत आज हें बुडे.
करुं नये वाटते भ्रमण भविष्यांतुनी
द्यावीच जागच्या जागीं ही पीडित वपु टाकुनी.
मज दुष्ट सुष्ट वा कांहीं वद ईश्वरा
तूं त्वरा करुनि दीनाला ने शांत आपुल्या घरा.

२८–७–२९

---

# फुलमाळीण

[ ज्या शक्तीमुळें अनंत विश्वें आकाशांत संचरत आहेत तिचे उद्गार ]

कुठें न वसणारी–असें मी फुलें ग विकणारी
आद्यंताच्या टोकावरती–मौजा करणारी.
पोकळीचा मळा
बाई तेजाच्या ग जळां
शिंपुन बागबगीचे मी ग नवे उभविणारी
कुठें न वसणारी–असें मी फुलें ग विकणारी.
ब्रह्मांडाचा दादा
आला करावया सवदा
खुडून राजीनें मी त्याला दिली ग परडी करीं
कुठें न वसणारी–असें मी फुलें ग विकणारी.
पाताळाची माय
आली धरून माझा पाय
फुलें टाकिलीं–ओंजळभर मी हसत तिच्या पदरीं
कुठें न वसणारी–असें मी फुलें ग विकणारी.
रविशशि नक्षत्रें
गुणगुणताती जन सारे
बागांतिल सुकलेलीं माझ्या फुलें ग हीं सारीं
कुठें न वसणारी असें मी फुलें ग विकणारी.
फुटक्या सवद्यावरी
अशी मी फुलें ग विकणारी
आद्यंताच्या टोकावरती मौजा करणारी—

# आवडीची भिक्षा

[ एका भिकारणीचे उद्गार ]

[ चाल – भूपतिवैभव ]

टाकितांच पाऊल दारीं तूं येतोस
धावून पाडुनी गोड खळी गालास !
बोबडे बोल मग अस्फुट बोलुन कांहीं
आल्याच पाउलीं जासी घाई घाई !
वाटते प्रभा, पण पुन्हां तुझ्या वदनाची
येणार पुढें उधळीत रास हर्षाची.
आणि तूं परतसी क्षणांत नव उल्हासें
आणुनी मुखावर कृतकृत्याचें हांसें !
चिमुकली मूठ हाताची – वळवुनी
येतोस पुढें तूं माझ्या – धावुनी
मार्गांच जरी ती जाते – सांडुनी
उघडतांच झोळी सोडितोस ती आंत
तरि भिक्षेवर या जडली माझी प्रीत !

# संभाजी

[ सुनीत ]

सम्राटा ! तुजला प्रणाम करण्या खालीं लवें जों शिर
पायीं दृश्य बघून भेसुर तुझ्या प्रक्षुब्ध हो अंतर,
आप्तांचा छळ, राजनिष्ठ जनता, दुःखार्त तें क्रंदन—
कर्णीं एकवटून शाप वदती द्यावा तुला दारुण.
शौर्याब्धीं खवळून जो परि तुझ्या वक्षस्थलीं राहतो
शोधाया गुणरत्न एक मग मी तो थोडका मंथितों,
येतां दारुण दुर्गुणांतिल परी हातांत हालाहल
धिक्कारून तुला सखेद वसतो चित्तांत कोलाहल.
—संभाजी, अपुल्याच घातक कसा झालास वंशद्रुमा ?
राष्ट्राच्या इतिहास-शुभ्रपटला तूं लाविला काळिमा.
माझ्या दृष्टिपुढून पार्थिव परी मूर्ती तुझी लोप त
मेघांच्या वलयांत विद्युत घडे आकाशवाणी मनीं.
"राष्ट्र आणि कुळें अशाश्वत पुढें कालाचिया राहतां
कालाचा बडिजाव पाडिल फिका हा धर्मवीराग्रणी !"

–१ - २७

# सदरेंतील पैजेचे विडे

शिवराज कैदेंतून निसटून गेले ही वार्ता हां हां म्हणतां चोहोंकडे पसरली. त्यांस धरण्यास्तव औरंगजेब बादशहानें सदरेंत पैजेचे विडे मांडले. ही कामगिरी एका मराठभाईनें स्वीकारलेली पाहतांच शिवाजीमहाराजांबद्दल अभिमान असलेल्या एका तरुणानें त्याच्यावर चालून जाण्यास मागें पुढें पाहिलें नाहीं. तरुणाची आहुती तेथेंच पडली. पण त्याचे उद्गार मात्र अजरामर झाले. कथानक काल्पनिक आहे.

[ चाल – उद्धवा शांतवन ]

'बादळांत सोसाट्याच्या – शिवराज उडोनी गेले !'
दिल्लींत सुटे ही वार्ता – दिल्लीश मनीं घाबरले
जरबीचे अरबस्तानी – घोड्यावर काफिर सुटले
यमुनेच्या दुथडीवरुनी
भरधाव चालली वाणी
तरबेज पाहिजे पागी
'सदरेंत विडे पैजेचे – उचलील खडे जे कोण.'
शृंगारुन राजमहालीं – सिंहासन थाटुन राजे
बैसले पोंवळीयांचे – लोंबती घोंस वर साजे—
झुलणारें झुंबर भोंती – मानकरी बसले राजे
हनुवटीस डावा हात
उजवा भंवती फिरवीत
दिल्लीश इशारत देत
सदरेंत विडे पैजेचे – उचलणार आतां कोण ?
सांवरीत मंदिल उठले – तों मराठभाई एक
म्यानांतिल समशेरीचें – आवेशें उपसित टोक
नोक झोक त्यांचा सांगे – 'पिंजऱ्यांतले हे वाघ'

छाती काढुन भरदार
शब्द जों पुढें वदणार
आवाज घुमे तों थोर
'सदरेंत विडे पैजेचे – उचलणार आपण कोण?'
घेऊन सशाचे कान – दरबार बघे चौफेरी
सळसळल्या नागावाणी – तरुणाची चमके स्वारी
बघुन त्या दडाल्यावेळीं – लेच्यापेच्या समशेरी
तरबेज उसळुनी पाणी
तें गेलें वाघावरुनी
घ्यायास घडा यमसदनीं
'सदरेंत विडे पैजेचे – उचलणार आपण कोण?'

* * *

क्षणभर जरि बादशहाचें – नेत्रद्वय दिपुनी गेलें
तरि तेंच तेज तरुणाच्या – अंताला कारण झालें
बोल ते स्वाभिमानाचे – तरुणाचे नच मावळले
वच घुमले ते सदरेंत
घुमतात अजुन कानांत
घुमवीन महाराष्ट्रांत
'सदरेंत विडे पैजेचे – उचलणार आपण कोण?'

१-४-२३

# 'अजून आहे फुटावयाचें सख्या पुढें तांबडें !'

अजून आहे फुटावयाचें सख्या पुढें तांबडें !
क्षितिजमुखावर विलसायाचें स्मितप्रभेचें कडें.
विहंगमांचा मंगलमेळा जागा मग होइल
आनंदी हृदयांतुन 'किलबिल' हें गाणें गाइल.
विरुनी जातिल दंवबिंदू हीं फुलतिल बागीं फुलें
'कांहितरी' वर गुणगुणुनी मग बागडतिल अलिकुलें.
—तोंच कां बरें निराशतेनें वघसी तूं चहुंकडे
अजून आहे फुटावयाचें सख्या पुढें तांबडें !

* * *

"परसैन्यानें अर्धाधिक हा टापु असे घेरिला
एकहि नाहीं उरला कोणी म्हणावया आपुला !
समशेरीच्या धारेवरुनी चालायाचे पुढे
आधारावर कोणाच्या हें थोर पडे साकडें."
—एकहि नाहीं रक्तबिंदु तव छातींतुन सांडला
समशेरीचा एक न सुटला घाव तुझा मोकळा.
तोंवर वीरा काढुं नको हे वच असले हो पुढें
अजून आहे फुटावयाचें सख्या ! पुढें तांबडें !

* * *

'स्वजनांचा मी दोष न केला तरि ते मज टाळिती
परके मजला गुलाम म्हणुनी सदैव हेटाळिती !
'स्वजन' म्हणूनी निमुटपणें तें सहन करावें मनीं
परकीयाचे पाय पुसावे पोटासाठीं जनीं !'
—विचारसरणी मलीन नाहीं झाली तव जोंवर
जोंवर आहे स्वर्गंगेहुन निर्मळ तव अंतर.

—तोंवर असल्या परिस्थितीनें जीव तुझा कां कढे!
—अजून आहे फुटावयाचें सख्या! पुढें तांबडें!

१९२४

---

# होईल फिरुन भू शांतमया

[जाति - प्रणयप्रभा]

होईल फिरुन भू शांतमया
दावील ईश अदभुत किमया
रविकिरणांचा ताप भयंकर
भंगुन गेले कठीण भूधर
— परचक्रांतच तनु अभ्यंतर —
येतिल निर्झर त्यांतुन उदया.
आम्राचा मोहोर गळाला
विहंगमांचा थवा पळाला
— मित्रसंघ निर्धनास तुजला —
ये पुढें बहर बहुसाल तया!
वातचक्र संचरे सभोंतीं
स्थिरचर नेऊं बघे अनंतीं
— जेंवि तुला ही दुनिया उलटी —
होईल सर्व पण निरामया.
विपिन दाट दिनिं निशा अवकळा
निशाचरांचा भंवती मेळा.
हातांत तुझ्या कोयता विळा
कर कार्य असें देवास दया
होईल फिरुन भू शांतमया.

२२-४-३०

---

# तूं आणि संसृतिताप

[ जाति – पांडव ]

तापल्या कीं वाळवंटांतील वारा वाहतो
देत आल्हादा वसंताच्या प्रभातांतील तो !
दीर्घ जे फूत्कार सोडी हे विषाचे पन्नग
ते गमे निर्व्याज हांसें बालकाचें मोहक !
तीक्ष्ण मी काट्यासराट्यांतून आहे चाललों
पुष्पशय्येतील निद्रासौख्य कैसें पावलों !
डोंब आगीचा जळे कीं तप्तभानू लोचनीं
दे सुधाधारा शशी त्यांच्यांत वाटे फेकुनी !
स्फोट हें लाव्हारसाचे देह माझा वेष्टिती
वाटते राशी हिमाच्या थण्ड खालीं लोटती !
रुद्ररूपा पाहुनी भूपृष्ठ सारें कापलें
स्तब्ध वाटे कीं जलीं नौका पुढे मागें हलें !
व्यापुनी ब्रह्मांड राहे देवदत्ताचा रव
कोकिलालापांतले कां भासतें हें मार्दव !
संसृतीतापांत देवा ! देह माझा पोळतां
लाभते तुझ्या स्मृतीनें गोड चित्तीं शांतता !

३०–७–१९२९

## "आणिलें तयें मज शांतिस्थानाप्रत"

[ जाति – मंजरी ]

संसार-ताप शमवाया सायंतनीं
मी गेलों ग्रंथालयीं अधिर होउनी.
वर्तमानपत्रें दैनिक साप्ताहिकें
सोत्कंठ चाळिलीं नानाविध मासिकें.
लाधली न चित्ता अल्प परी शांतता
कळलें न तयाला काय हवें तत्त्वतां.
'राजकारणांतिल डावपेंच मोहक'
'बहु मुत्सद्यांचें भाषण सांभाविक'
'व्यापारीतांडव राष्ट्राराष्ट्रांतिल
परिषदा जगांतिल आरमार-नाशक'
वा विश्वहितेच्छू संघ शांतिवर्धक
निवंवूं नच शकलें दुःख चित्तदाहक.

* * *

तों सहज पाहिलें काव्य एक लोचनीं
ध्रुवपदें तयाच्या मन गेलें मोहुनी.
गूढार्थ तयाचा जरी न मज उमगला
त्या बिनर्थांत संदेश दिव्य लाधला.
अस्पष्ट तयें मम मानसचक्षूपुढें
उभविलीं स्मारकें वेड जयांचे जडें.
पाहिलें – "निसर्गा करितांना क्रीडन
मानवाचिया हातांत हात घालुन.

मृत-देह न पुतळे सजीवतेचे उभे
शोभवीत होते 'वेस्ट मिनिस्टर अबे.'
नरमणी तळाला बुडतांना पाहुन
प्रक्षुब्ध जाहल्या महासागरांतुन.
राक्षसीं जहाजें प्रचण्ड अवलोकिलीं
वर जयें काढिले जयनादें नरमणी."
कृति, विचार यांचा संगम आल्हादक
आढळे जिव्हाळा ज्यांत हृदयभेदक—
कीं असेल माझें वर्णन हें ओखटें
पण मूळ-काव्य तें माझ्या चित्ता पटे.
मी घरा परतलों मार्गांतिल दीपिका
जाहल्या अल्पहि न मजला पथदर्शिका.
मुखिं होतें माझ्या ध्रुवपद जें घोळत
आणिलें तयें मज शांतिस्थानाप्रत.

२१-३-३२

## नास्तिकाचे विचार

देव नाहीं जगीं धर्म नाहीं तसा
कल्पना या खुळ्या मानसा.

पापपुण्यद्वयें आणि खोटें खरें
यामधें ढोंग सारें भरे.

पावला जो झरा जन्म शैलामधें
वाहतो भूवरीं तो मुदें.

लुप्त होवो मधीं वा मिळो सागरा
खंत त्याची न त्यातें जरा.

जन्ममृत्यूचिया गूढ तत्त्वांत कां
व्यर्थ चित्तास तूं गुंतवावें ?

प्राप्त या जीविता नाशवंती फुका
सांग पूर्वग्रहें कां गणावें ?

पोकळीच्यामधें गोलमाला भ्रमे
एक ही त्यांतली मेदिनी !

आदि किंवा तिचा अंत तूं संभ्रमें
लाविसी व्यर्थ कां मागुनी ?

दृश्य तें बा खरें सूर्य चंद्राचिया
तेजराशीमधें मोद मानी.

हासुनी खेळुनी जीविता माजिया
नित्य जावें तुवां गुंगुनी.

सौख्य भोगावया मानवाचा जगीं
जन्म झाला मला वाटतें.

सांग तत्त्वाचिया आमिषीं कां उगी
त्वन्मती अक्षयीं भागते.
टाकुनी जाल तूं बैस आजन्म जा
गुंतवाया जलीं सावजा.
त्यांत गांभीर्य ना लभ्य इच्छा तुझी
पूर्ण बा कोठुनी व्हायची !
जाहले जे जगीं तत्त्वसंशोधक
काय त्यांनीं तरी साधिलें ?
क्षीण बुद्धप्रती देउनी नाहक
शब्द देवादि हे निर्मिले !
धाक दावावया बालका माउली
'दाविते वस्तु भीतिप्रदा.
आणि बुद्धीचिया शुद्ध त्याच्या नदा
रीतं लावी निसर्गागळी.
तत्त्वतां देह हा अस्थिचा सांपळा
त्यांत चैतन्य जें का उडे.
वाटते लाट कीं स्तब्ध अब्धीतळा
सोडुनी वायुयोगें उठे !
संयमीं बांधुनी तीस कां ठेविसी ?
राज्ययंत्रामधें कोंडिसी ?
आज नाहीं उद्यां पाश फोडून ती
जावयाची स्वधामाप्रती !
स्वैर रानामधें श्वापदें हिंडती
ऐकुं येतात झिल्लीरव.

सप्त सिंधूतळीं मत्स्य संचारती
जीवना त्यांचिया आठव.
खेद सोडून दे ! देव तूं तत्त्वतां !
धर्म आहे तुझा स्वैरता !

२९-३-३०

# ती धन्य बंदिशाला

[ चाल – आनंदकंद ]

दे स्फूर्ति गायनाला – ती धन्य बंदिशाला.
श्रीकृष्णजन्म झाला
संपूज्य भूतयाला
ज्या भूषवी स्थळाला – ती धन्य बंदिशाला.
हेतू पराक्रमाला
श्रीरामचंद्रजीला
सीतेचिया यशाला – ती धन्य बंदिशाला.
कालास ठेवि राजी
भासे पतिव्रता जी
जो सत्यवान त्याला – ती धन्य बंदिशाला
हो ध्येयशून्य सृष्टी
द्यायास दिव्यदृष्टी
गीता धनंजयाला – ती धन्य बंदिशाला.
भ्याडास कर्म बोधी
वीरास कार्यसिद्धी
जी मुक्ति भाविकाला – ती धन्य बंदिशाला.
लोकैक वीर झाले
वंदून हीस गेले
जी वंद्य भावि काला – ती धन्य बंदिशाला.
पोटीं तमास घेई
नृमणीस ठाव देई
कीं रात्र भास्कराला – ती धन्य बंदिशाला.

येथेंच शंभुराजे
सद्धर्मवीर गाजे
जी श्रीशिवास लीला – ती धन्य बंदिशाला.
'गीतारहस्य' बाला
'कमला' विनायकाला
दे स्फूर्ति गावयाला – ती धन्य बंदिशाला.
प्रासाद मुक्ततेचे
विश्वैक्यशांततेचे
जी साधना अशाला – ती धन्य बंदिशाला.

२३-१२-२९

# निर्भय हो

[जाति – प्रणयप्रभा]

निर्भयता निजचित्तांत धरी
जा कर या दिव्यांतुन फेरी ॥ ध्रु० ॥

खरखलेला विस्तव बघ हा
त्याजवळ पडे पण धूप पहा
बिनधोक तयीं त्यास तूं वहा
होउं दे शुद्ध ही हवा तरी
धूम्रांत आणि मग सफर करी !

तुझापुढें धबधबा प्रचण्ड
कर्णी पडे ध्वनि तुझ्या उदण्ड
दृष्टि ठेव त्यावरी अखण्ड
उठतांच इन्द्रधनु सूर्य-करीं
घे दृश्य साठवुन निजांतरीं !

थोर वावटळ उठली भूवर
स्थिरचर पाहे उडूं नभावर
त्यांत निर्भयें तूं स्वारी कर
बघ नंदनवन तें कसें तरी
जा कर या दिव्यांतुन फेरी !

षड्ऋतूंतला वर्षाकाळ
वर्षे पाउस सांजसकाळ
शुद्ध बघे होऊं हें भूतल
टाकून हृदय – मलिनता दुरी
तूं त्यांत निमज्जन पूर्ण करी !

३१-७-३२

---

२३६५६ ९३ ना. दि.

## मज झोंप शांत घेऊं दे

खग अरुणास्तव मधु गान करी
रिझवी तरुगण पवन सुस्वरीं
आळविती सागरास लहरी
मजहि गाऊं दे – तुज कांहींधे रिझवूं दे.
तरुतल गांठी पशु माध्यान्हीं
कोटरांत खग राही पडुनी
संथ वाहते गभीर तटिनी
मजहि येऊं दे – श्रम चरणीं तव निववूं दे.
वळे गुरांचा कळप घराला
विसाव्यास पांथस्थ निघाला
कारण रवि अस्तास चालला
अधिर होऊं दे – मज तुजपाशीं येऊं दे.
शांततेंत हो विलीन जनता
निसर्गांत संचरे स्तब्धता
कुरवाळी जग रजनी - माता
प्रभो! घेऊं दे – मज झोंप शांत होऊं दे!

२४-७-२७

---

## गान समर्पण

[गज्झल]

उषा संध्या सुखें फेकी
नभीं मेघांत रंगास
कशाची स्पर्शते त्यांच्या
अपेक्षा अंतरंगास?

किनाऱ्याला तरंगांनीं
स्वयें न्हाणी महासिन्धु
विषादीं वा न तो हर्षी –
बुडे निंदू कुणी वंदू !
फुलोनी पुष्प आमोदा
सुखें वाऱ्यावरी वाही.
कुणी आस्वाद घेवो वा
न घेवो खंत त्या नाहीं !
स्वसामर्थ्यास दावाया
निसर्गाची महाराणी –
दऱ्याखोऱ्यास वा निर्मी
प्रपाता कां महारानीं !
गमे की प्रीतिचा चाले
जगीं या सारखा खेळ
रुचीचा वा अपेक्षेचा
न अर्थाचा जिला मेळ !

* * *

अशा प्रीतीस हीं गाणीं
सुखें स्वाधीन मी केलीं
न ये त्यांच्या भविष्याची
कधीं ध्यानामधें केली !

२-११-२९

# ओढणी

[ वृत्त – अभंग ]

१

साध्या शब्दासंगें कविता रांगते
तीस का लागते – यातायात ?
साध्या आठवणी खळखळा पाणी
आणिती नयनीं – नाहीं काय ?
साधे सुधे धागे – कोळी नित्य विणी
तेव्हां ना शोभूनी – येतें जाळें ?
साध्या शब्दें तैसा प्रभू आळवितो
परी तो द्रवतो – तयानेंच.

२

मोत्यांची शिंपलीं फुटोनिया गेलीं
मोलाचें हें मोतीं – देऊनिया
सोन्याचा हा साज अग्नींत पडला
होऊन तो आला – मूल्यवान.
काळ चालला हा प्रलयकाळाला
नवें आणायाला – रामराज्य.
जीविताची निशा प्रभो ही संपली
कोठें मावळली – तुझी प्रभा ?

३

सोसाट्याचा वारा आला आणि गेला
दर्या परी झाला — पर्याकुल.
लागलें सुटलें सूर्यातें ग्रहण
झाले परी जन — भयाभीत.
पेटला विझला वनीं दावानल
उडाला गोंधळ — पशु-पक्षीं.
पुष्प उमललें आणि कोमेजलें
देवापायीं झालें — देवमान्य.
आलों आजि गेलों तसा जगीं देवा,
दृष्टांत हा नवा — देखियला.
तुझें मनीं ध्यान — केलें मी न केलें
तोंच ओलांडिलें — भव-तीर.

४

एखादाच मेघ वेळीं आवर्षूनी
नेई ही अवनी — समृद्धीतें
एखादीच शिंप पाणबुड्याहातीं
सापडली तों ती — मोतियाची.
एखादाच कोणी रानीं वनीं हिंडे
दैवें तो सांपडे — परीस त्या.
एखादीच ऐशी काळवेळ लाभे
अशुभातें शोभे — शुभ जी का.

* * *

एखादाच क्षण माझिया जन्माचा
प्रभुजी तुमचा – ध्यास करी
एखादाच परी कोट्यवधी तारी
जन्माच्या श्रीहरी – फेऱ्या माझ्या.

५

अंधार नाशाया रवीची उत्पत्ति
ना तरी महती – काय त्याची ?
अग्नी विझवाया जलाचें जीवन
ना तरी त्या कोण – विचारतो ?
मिटवाया लोकीं दारुण कलह
भूपतीचा इह – वास ना हो !
मजसम पापी उद्धाराया जन
देवा, त्वज्जीवन – नाहीं काय ?

६

अस्तोदय देवा विहंग - वृंदांचा
गोड गावयाचा – नाहीं काय ?
माध्यान्हाची वेळ गुरावांसरांची
पाण्याला जायाची – नदीवर.
रात्रीच्या प्रहरीं जागे निशाचर
खेळावया स्वैर – चहूंकडे.

* * *

विश्व असें देवा, वाटून दिलेंस
सुखें ज्याचें त्यास – खेळावया.
माझेसाठीं परी कोठें कांहीं नाहीं
म्हणून ही पायीं – धांव तुझ्या.

७

पाणी आणायला नदीवर गेलों
पात्र विसरलों – परी घरीं.
शिकार साधाया वनामधें आलों
घरीं विसरलों – बाणभाता.
सत्कीर्ति मुठींत धावलों धराया
दूर ठेवुनिया – सत्कृत्यातें.
प्रभुजीचें गीत गावया बसलों
भक्तीवीण झालों – परी मुका.

८

कण्हेरीचें फूल दूर हें फेकून
गुलाब सुमन – घेतों आम्ही.
रात्र घालवितों डोळे हे मिटून
मोदें येतां दिन – उल्हासतों
वर्षांचा वसंत आम्हालागीं गोड
सारे त्यांत कोड – पुरवितों.
पाषाण हिऱ्यांचे ढीग येतां पुढें
हिरेच तेवढे – निवडितों.

* * *

चांगुलपणाचें कौतुक करावें
आम्हा हें स्वभावें – ठावें देवा.
गोड तुझें नांव मुखीं मग घ्यावें
एवढें न व्हावें – का तें सांग.

९

उभी माझ्या राहे अन्नपूर्णा दारीं
　　लेश नाहीं परी – तिचा मुखीं.
सभोंतालीं सारें पाण्याचेच लोट
　　पडला अलोट – कंठशोष.
चंदनाचीं झाडें सभोंतीं जळती
　　आकळेना चित्तीं – सुगंध तो.
एकांतीं करितों देवा तुझें ध्यान
　　बुडे परी मन – कोलाहलीं.

१०

कठीण पर्वत फोडितां फोडितां
　　गोड झरे हाता – लागतात.
रानीं वनीं नित्य हिंडतां हिंडतां
　　गोड फळें हाता – लाभतात.
रात्रंदिन कष्ट करितां करितां
　　सत्कीर्ति ये हाता – एकदिनी.
प्रभो, तुझें ध्यान करितां करितां
　　लागेल का चित्ता – ठाव तुझा ?

११

पांची पक्वान्नाचें ताट भरा उठा
　　तुम्ही झटापटा – गरिबांनो.
लुळ्या पांगळ्यांनो पानें मांडा नीट
　　उठवा हा थाट – चांगलासा.
आंधळ्याची माळ कोणीकडे गेली
　　वाढायाची झाली – सांगा वेळ.

मुक्या असशी तूं — जा जा प्रभूकडे
सत्वर इकडे — त्यांना आण.
सर्व कांहीं झाली प्रभुजी तयारी
आपुली का स्वारी — विलंबली ?

१२

उभा राहे रवी आकाशाचे दारीं
उजेड दे परी — महीस या.
उभा राहे मेघ अंबरांत दूर
चातक अंतर — तोषवाया.
उभा राहे शशी नभीं माथ्यावर
अर्पी सुधाधार — चकोरातें.
उभा राहे वाटे अज्ञेयाचें दारीं
दीनांचा कैवारी — माझेसाठीं.

१३

नको म्हणतांही फूल दृष्टी पडे
हुंगावेसें वाटे — मजलागीं.
नको म्हणतांही वाऱ्याची लहर
येतें मदंतर — तोषवाया.
नको म्हणतांही हर्ष होई फार
नभीं चंद्रकोर — पाहुनियां.
नको म्हणतांही तुझ्या मी गायनीं
जाईन रमुनी — केव्हां देवा ?

१४

मागें मागें रवी पहात पहात
आक्रमितो पथ — पुढचा तो.
दृष्टिक्षेप मागें टाकीत टाकीत
सरिता वाहत — पुढें राहे.
क्षणोक्षणीं मागें रहात रहात
'वर्तमान' होत — पुढें पुढें.
पुढें पुढें देवा, पहात पहात
कसा मी राहत — मागें मागें ?

१५

देवा, मी गाठिली रम्य वनराई
बोंचला तों पायीं — काटा माझ्या.
मारिली जों बुडी शांत सरितेंत
अचुक डोहांत — सापडलों.
चंदनाच्या सुखें बसलों छायेंत
भुजंग धावत — तोंच आले.
चोहोंकडे माझा झाला असा छळ
काढिला मी पळ — तुझ्याकडे.

१६

फुलाचें स्वरूप आधीं मोही मन
सुवास सेवन — मागाहून.
भरली सरिता भागवी तहान
तिचें जल-पान — मागाहून.
बोबडे बालाचे बोल आधीं गोड
अर्थाची ती फोड — मागाहून.

देवा, तुझ्या नामीं आधीं मला मुक्ति
कशी आणि कां ती – मागाहून.

१७

ओलांडून जातां माध्यान्ह एवढी
रविराज गाठी – सायंकाल.
ओलांडून जातां शुष्क माळरान
सरिता वळण – घेते गोड.
ओलांडून जाता तारूं हा सागर
पुढें रम्य तीर – त्यास लाभे
ओलांडून जातां संसार दारुण
पुढें ये भवन – प्रभुजीचें.

१८

उपजत ग्रासी अंजनीचा बाळ
सूर्याचे विशाळ – लालबिंब.
उपजत देई तृषार्ता जीवन
वाहतां जीवन – मार्गातून.
उपजत वाहे मंद समीरण
हरायास मन – दुःखितांचें.
उपजत देवा, माझा का स्वभाव
दीनासाठीं धाव – घेत नाहीं ?

१९

फुलांची राहतां माळ ही अपुरी
वाटते अंतरीं – चुकलेसें.
ओझरती घेतां भेट प्रेमीजन
राहते लागुन – हुरहूर.

काव्य करतांना होता अगतिक
उठते तिडिक — मस्तकाची.
तुझें मी करितों अर्धवट ध्यान
तरी का मन्मन — संतोषतें ?

२०

नाहीं फार दूर आकाशींचा सूर्य
लाभतां सामर्थ्य — मारुताचें.
नाहीं सागराचा तळ खोल फार
होतां जलचर — जीवन हें.
नाहीं भयावह विपिनीं फिरणें
मृगेंद्राचें जिणें — येतां हातीं.
नाहीं देवराया फार दूरवर
भक्तीचें अंतर — असतांना.

२१

उगवण्यापूर्वीं रवि गेला लया
भू-भेट ही तया — काय होय ?
जन्मापूर्वीं प्राणी मरण पावला
मोक्ष आचवला — काय तया ?
दृष्टी जाण्यापूर्वीं दृश्यें पूर्ण झालीं
प्रभा साठवली — काय होय ?
संसरण्यापूर्वीं संसार जाणिला
सुख त्यांत मला — देवा काय ?

२२

वसुंधरा नित्य पाशांत राहते
तरी ती गुंगते — स्वतांभोंतीं.

भास्कराचा कर इंदूस आधार
हास्याचे तुषार — सोडी तरी.
नियमनीं आहे वेष्टिला सागर
तरी स्वेच्छाचार — चाले त्याचा.
व्यापाच्या जाळ्यांत देवा, मी राहतों
भजन करितों — तरी तुझें.

२३

चिखलांत रोज बीज हें रुजतें
तरी तें धरितें — वृक्षरूप.
काळ्या मेघोंदरीं वीज पहुडते
देहीं ती धरिते — उज्वलता.
कोकिळेच्या कृष्णकंठांत दडून
राहतें गायन — मनोहर.
अंधारांत देवा, लोपे मज्जीवन
प्रभा त्यास पण — लाभेल का ?

२४

चरावया बैल रानांत निघाले
क्षण विसरले — धन्यास ते.
आखाड्यांत मल्ल झुंजाया लागले
क्षण विसरले — देहभान.
रांगत बाळ हें अंगणांत आलें
घरचें कुठलें — भान तया ?
संसारांत देवा, मला तूं सोडिलें
स्वाभाविक झालें — विस्मरण.

२५

गोणी पाठीवर बैलाच्या लादली
तीहि त्यास झाली – जड नाहीं.
शिला ही लोटिली पर्वताच्या पाठीं
तीहि त्यास मोठी – भासली ना.
असंख्य नद घे सिंधू निज – देहीं
त्याची त्यास कांहीं – फिकीर का ?
व्याप माझ्यामागें देवा तूं लाविला
पाहिजे साहिला – मीही सुखें.

२६

उदयाचलीं ये अरुण म्हणून
काय पक्षीगण – गातात हे.
पौर्णिमेचा चंद्र वर ये म्हणून
सिंधू आनंदून – जाई काय ?
मंद समीरणें हाले उपवन
चाले का म्हणून – गान त्यांत.
नव्हे नव्हे आले देवाचे हे दूत
म्हणून संगीत – चाललें हें.

२७

क्षुब्ध झाला सिंधू एकच लहर
त्यांतून का वर – यावी कधीं ?
संध्याकाळ झाली रंगाचा तुषार
पडे मेघावर – एकच का ?
नभीं विलसलें इंद्रधनुष्य हें
एकच का राहे – रंग त्यांत ?

कसा देवा व्हावा, एकच तरंग
  कल्पनेचा दंग — तुझ्या गानीं ?

२८

आले तसे पक्षी वृक्षीं या बसले
  तरूस ते झाले — शोभादायी.
फुटेल त्या मार्गी जल वाहूं लागे
  तेंही वळण घे — मनोहर.
हवें तसें बाळ खेळाया लागलें
  दृश्य तें जाहलें — सुखावह.
आले तसें मनीं विचार मांडिलें
  देवा, तुला झाले — मान्य काय ?

२९

कड्यांतून करी खळबळ पाणी
  झालें दीनवाणी — येतां खालीं.
माध्यान्हीचे कर झाले तापदायी
  सौम्य होती तेही — येतां खालीं.
भिडली सिंधूची लाट आकाशास
  झाली ती उदास — येतां खालीं
देवा झाला जरी माझा अधःपात
  पश्चात्ताप होत — कसा नाहीं ?

३०

देवा तुझ्या गळां हार न घातला
  मीहि न टेविला — माझ्या कंठीं.
तसे तुझे गुण नाहीं वाखाणिले
  मीहि न वाणिले — माझे कधीं.

चरण मी तुझे कधीं न वंदिले
माझेहि न केले – पूज्य लोकीं.
देवा, तुझी अशी भक्ति मी न केली—
तरी तूं दाविली – कृपा तेव्हां.

३१

हिरवळ दाटे रानावनांतून
गाई ' मूक गान ' – वारा त्यांत.
नभांगणीं येतां शशांक हासत
गाती ' मुग्ध – गीत ' – तारका तों.
महासागर हा दिसतो प्रशांत
गाती लाटा त्यांत – ' मुग्ध – गान '
विराट – स्वरूपा देवा तुझें गान
' वाणीस ' या शीण – मात्र आहे.

३२

घराची सगळीं केलीं बंद दारें
थोडें तरी वारें – आंत राही.
थोडा तरी होई सिंधू खालींवर
जरी सभोंवार – प्रशांत तो.
जाळून हीं काष्टें झालीं सर्व खाक
थोडी धुगधुग – तरी त्यांत.
घातला मनाला देवा पायबंध
थोडें तें स्वच्छंद – तरी राही.

३३

आकाशामधूनी सूर्य पुढें गेला
प्रकाश पडला – घरेवर.

वर्षालागिं गेला वसंत भेटून
पालवी फुटून – तरूस ये.
अंतराळांतून संचरला वारा
रानमाळ सारा – झाला सुखी.
दृष्टीपुढून या गेले संतजन
जीवना देऊन – सार्थकता.

३४

पूर्ण विकसतां हृदय - कमळ
तुझा परिमळ – दाटो त्यांत.
लोचना पुढून होता तम दूर
स्वरूप सुंदर – दिसो तुझें.
निघतां मंजूळ ध्वनी वाणींतून
त्यांत गुण - गान – तुझें स्फुरो.
कोठेंही मजला लाभतां पूर्णता
देवा, अपूर्णता – तुझी राहो.

३५

तुझिया ललाटीं चंद्रमा शोभतो
परी तो पावतो – क्षय - वृद्धी.
मोतियाचें पाणी तुझ्या लोचनांत
परी नाशवंत – तेंही आहे.
कमलास तुझ्या पाउलीं विकास
म्लान कळा त्यास – पण येई.
शाश्वत सौंदर्या, अभिजात कवे
उपमान द्यावें – तुला काय ?

३६

खावयास नाहीं अन्न घांसभर
अशाचें का घर – वृथा फोडूं ?
जेथें हंसकुल होतें तृषाकुल
डुंबायास जल – शोधूं तिथें ?
पुष्पांचे ताटवे भ्रमर त्यागिती
अशा ठायीं रती – कशी ठेवूं ?
त्रैलोक्याधिपते – तुझें कोशागार
सजे हा पामर – लुटावया.

३८

फुलें वेचायाला बागेमधें आलों
पहात बसलों – शोभा तेथें.
पाण्यावर नेलीं नदीवर गुरें
रमलों पाखरें – पाहतांना.
पाण्यांत टाकुनी बसलों मी गळ
किती गेला वेळ – ध्यान नाहीं.
जगदीशा तुझा जगीं दूत झालों
रंगून मी गेलों – संसारांत.

३८

हलुहळू लागे पुष्प उमलाया
सुगंध दाटाया – तोंच त्यांत.
हलुहळू लागे तांबडें फुटाया
किलबील व्हाया – पक्षिगणीं.
हलुहळू लागे अंगुली फिराया
सुस्वर निघाया – तंतुवाद्यीं.

हलुहळू लागे मन निवळाया
त्यांत तों दिसाया – प्रभु-रूप.

३९

दिवसांतून ये एकदां सकाळ
सारें भू-मंडळ – जागवाया.
युगांयुगांतून एखादी विभूति
अवतरे क्षिति – उद्धराया.
वर्षांतुन येतो हंगाम पिकांना
एकदांच जना – तोषवाया.
स्वरूपाची देवा, तुझी विद्युलता
'एकदांच' चित्ता – प्रकाश दे.

४०

नवविध रंग नभीं तरंगले
लोचनास झाले – प्रिय कांहीं.
अनेक वाफे हे पिकांचे लाविले
कृषीवला झाले – मान्य थोडे.
पडले रत्नांचे ढीग; पसंतीस—
रत्नपारख्यास – अल्प, आले.
विभो, तुझ्यास्तव सतार छेडितों
रुचेल राग तो – मानून घे.

४१

विहिरींत राहे पारवा घुमून
काय तो स्व-स्थान – निंदितसे ?
वेलीवर डोले पुष्प मनोहर
बोले का 'निःसार – माझें जिणें' ?

पक्षी वृक्षावर गोड गीत गाई
शाप काय देई — तरूस तो ?
सुंदर जगांत देवा माझा वास
अमंगल त्यास — कसें बोलूं ?

४२

सर्व इंदुकला प्रिय सागरास
परी पौर्णिमेस — आलिंगी तो.
वर्ष - ऋतू सारे प्रिय कोकिळास
नव - कंठ त्यास — वसंती ये.
तिन्ही काळ होती प्रिय शीतांशूस
पण यामिनीस — हासतो तो.
नानाविषय मी देवा नित्य गातों
फार आनंदतों — तुझ्या गानीं.

४३

रवि - कर सारे विटले महीला
गेले पाताळाला — शेवटास.
तारका विटली नभाला पुरती
आली ती खालती — महीवरी.

* * *

फुलाला विटला सुगंध निघाला
स्वर्गी जावयाला — क्षणामधें.
सागराला पुरें जल हें विटलें
गाठाया निघालें — इंद्रपद.

* * *

जीवाला मी आहे विटलों जगांत
    आतां माझा अंत — काय आहे ?
यावयाचें खालीं ? जावयाचें वर ?
    काय तें सत्वर — सांग देवा !

४४

कधीं काळीं पडे थोडें आवर्षण
    तोंच सारे जन — गोंधळती.
कधीं काळीं होतो एक उल्कापात
    तोंच भयाभीत — होती जन.
कधीं काळीं येते अमंगळ साथ
    सारें तों जगत — होते कष्टी.
देवा, तुझें होतां थोडें विस्मरण
    दुःखांत भुवन — बुडेल का ?

४५

आग देवा माझ्या देहास लागली.
    नाहीं का भिडली — तुझ्या पदा ?
निराशा-सागर माझ्या भंवतालीं
    त्याची कां न आली — लाट पायीं ?
दुःस्थितीचा वेष्टी झंझावात मला
    त्याचा का न तुला — स्पर्श झाला ?
लागतात पथीं उपाधींच्या ठेचा
    पाट रुधिरांचा — न का दिसे ?
दरोडा घालिती आधिव्याधि देहीं
    कर्णी कां न येई — कोलाहल ?

जीव तोडूं तोडूं तुला हें सांगतां
द्रव तुझ्या चित्ता—कसा न ये !

४६

सावरूनी तोल शिशु उभा राहे
माय मागें पाहे—कौतुकानें.
बागडाया लागे कोकरूं अजाण
धर्नी कौतुकून—जाय मागें.
अल्लड हा तारा फिरे नभीं स्वैर
उभा सुधाकर—रक्षाया त्या.
तुमजुन देवा गातों तुझें गान
पाठिराखा पण—होतोस ना !

४७

साधो वा न साधो हें शरसंधान
धनुष्यास बाण—लाविला मी.
दिसो वा न दिसो पुढील तो पथ
धावाया सांप्रत—सजलों मी.
असो किंवा नसो खोल सिंधु—तळ
घ्यावयास ठाव—तयार मी.
भेटो वा न भेटो मजला सर्वेश
त्याच्या संगितास—गाईन मी.

४८

वर्षाकाळ येत गेले मेघगण
हृद्गत करून—खुलें लोकीं.
एक क्षण देतां भेट सौदामिनी
हृद्गत मोदिनी—करी खुलें.

सूर्याचें किरण भेटले देवास
खुले करायास — अंतरंग.
देवा आहे तुझी वाट मी पहात
कराया हृद्गत — खुलें मार्गे.

४९

अनंत आकाशीं अनंत तारका
अनंता त्यांत का — वास तुझा ?
अज्ञात सागरीं शिंपले अज्ञात
अज्ञाता का त्यांत — लपसी तूं ?
मनोहर पुष्पीं मनोहर वास
मनोहरा वास — त्यांत तुझा ?
वाचस्पतीस तूं वर्णातीत देवा
कसा मी वर्णावा — तुझा ठाव ?

५०

गर्दीत चुकलें रानचें पाखरूं
कोण लागे करूं — फडफड.
पाण्यांतून आला वर जलचर
करी खालीवर — तळमळ.
काटेऱ्या कुंपणी गोवत्स सापडे
फोडी हंबरडे — दीनवाणी.
दृश्यें हीं पाहूनी डोळां आलें पाणी
देवा, तें पुसुनी — काढाल का ?

५१

आजवरी दोष जेवढे मी केले
तेवढे मांडिले — तुझ्यापुढें.

ज्ञात सुहृदास ज्या न कधीं झाल्या
अवगत केल्या – गुजगोष्टी.
सूर्यकिरणांत जेवीं धुलीकण
आल्या त्या दिसून – पश्चात्तापीं.
त्यांनीं तुझें मन नाहीं संतोषलें
पाहिजे मी केलें – दुजें काय ?

५२

हृदयीं दाटती हृदयींचे भाव
बाहेर त्या वाव – मिळेचना.
बघतात जन प्रेमळ करून
उपचार मन – तोषवाया.
इंदू स्वकरानें न्हाणितो भूगोल
त्याचें चित्तानल – शांततें का ?
शासन वा कर थोर उपकार
नेत्रीं अश्रुधार – आण देवा.

५३

पाण्याचें गांभीर्य मनांत नेणून
बसलों घेऊन – हातीं जाळें.
क्षणाक्षणामागें नवेंनवें जाळें
कष्टानें विणिलें – स्वतांच मी.
सत्यरूप नाहीं जळाचें कळलें
सावज न आलें – इष्ट हातीं.
कानगोष्ट देवा मजलागीं सांग
ओटा वा अथांग – सागर हा ?

५४

उष्ण मी टाकितों उसासे म्हणून
का न ते साहून — दूर होसी.
दाटला हा कंठ बोलेन निष्ठुर
म्हणून का दूर — होतोस तूं.
हातपाय माझें गळाले म्हणून
काय आलिंगन — टाळितोस ?
अथवा मी तूंते स्तवितों प्रभुजी
काय इतराजी — म्हणून ही ?

५५

सांगतां तुजला वृत्त जीविताचें
देवा होतें तुझें — अधोमुख.
प्रशंसा करितां तुझिया गुणांची
होते वृत्ती तुझी — नम्र फार.
पाउलें मी जावीं तुझीं जों वंदाया
आशिर्वाद द्याया — वाकतोस.
स्वभाव तुझा हा कसा पालटावा
दर्शनाचा व्हावा — लाभ कसा ?

५६

धान्याची मोजणी मनांत करीत
भूमी नांगरीत — शेतकरी.
नव्या प्रदेशाचें चिंतन करीत
होडी वल्हवीत — खलाशी तो.
सुखें वर्तमानीं असतां रमत
स्वप्नें पडतात — गोड भावी.

आवर्षण किंवा अदृष्ट तुफान
चिंतनीं तुझ्या न — कळे मला.

५७

कोकिळेचा कंठ शिणे न गाऊन
उलट शोभून — येतो त्यानें.
पर्णांच्या भारानें पादप लवे न
उलट दिसून — येतो भव्य.
झिजे न वाहून सरितेचें पात्र
उलट विस्तृत — होतें तयें.
प्रभूस्तव काया शिणतां शिणे न
उलट नवीन — बल येई.

५८

असाध्य रवीची भेट रजनीस
कल्पिते ती त्यास — इंदु-रूपें.
असाध्य सिंधूचा ठाव निर्झरास
गाठी तो तयास — नदीरूपें.
असाध्य काळाचा आद्यंत दृष्टीस
वर्तमान त्यास — उभा करी.
असाध्य तूं देवा मज पामरास
होसी दृगोचर — भक्त-रूपें.

५९

क्षितिजास झालें रवीचें स्मरण
जाहलें तों म्लान — त्याचें मुख.
सरितेस झाली सागराची स्मृती
तिची चित्तवृत्ती — हेलावली.

होई पवनास आकाशाचा भास
तोंच ये तयास – स्थीरपणा.
होतां देवा, तुझी मला आठवण
काय दिव्यपण – सांग येई ?

६०

शीडावीण झालें तारूं का म्हणून
जावें तें बुडून – स्थिरार्णवीं ?
दृष्टीवीण आहे आक्रमणें पथ
सरळ मार्गांत – भय काय ?
स्वप्नावीण झाली निद्रा का म्हणून
घ्यावी ती जाणून – कालझोंप ?
देवसानिध्यास आचवला भक्त
नव्हे का तो मुक्त – तिन्ही काळ ?

६१

सोसाट्याचें गेले वादळ सरून
स्वच्छ ये दिसून – दृष्टिलार्गी.
पावसाच्या सरी गेल्या ओसरून
ये नवजीवन – सर्वांठायीं.
भरती ओहटी सिंधूची संपली
गोड कळा आली – त्यास अंतीं.
क्षण एक झालें माझें मन स्थिर
देवा, क्षणभर – भेट द्याना ?

६२

वृक्ष-वल्लरींचे अनेक प्रकार
मिळून सुंदर – बन बनें.

सतरंग जेव्हां एकत्र मिळती
तेव्हां ते निर्मिती – इंद्रधनू.
शून्यामध्यें ग्रह गोल सामावितां
ये एकरूपता – विश्वाची त्या.
साऱ्यावृत्ती होतां एक तुझ्याठायीं
अल्प भास होई – तुझा देवा.

६३

सुंदर का चित्र देवा तूं असावें
कपाटीं ठेवावें – पहावया.
सुवर्णकमल अथवा सुरेख
मोह जें नावेक – निर्मी मनीं
तलम कातीव वस्त्र प्रदर्शनीं
नित्य कौतुकुनी – पहायाचे.
बोलकी बाहुली – सुवासिक पुष्प
असो तुझें रूप – उपयोगी.

६४

जुळतां जुळे ना एक साधा सूर
बिघाड सतार – पावली का?
टाकिता टाकी ना पुढती पाऊल
झाले का नाठाळ – जनावर?
सरतां सरे ना आज निशा घोर
दुःख अनावर – झालें काय?
गातां गाववेना देवा तुझें गान
जीवास कळे न – काय झालें?

६५

देह आणि माझें मन पराधीन
त्याचें विकसन — व्हावें कसें ?
कुटुंब आणखी राष्ट्रांतील जन
झाले हीन दीन — परपाशीं.
देशादेशांतून अखिल विश्वांत
अन्योन्यांचा घात — होत आहे.
दैत्यासवें तूंही स्वर्गीं झगडसी
पालटावी कशी — दुर्दशा ही ?

६६

सर्वच पुष्पांचें सुरेख स्वरूप
सर्वांत सौरभ — काय पण ?
सर्वच वृक्षांना शाखा आणि पर्ण
सर्वांस का पण — घनछाया ?
सर्वच सरिता तुडुंब भरल्या
सर्वच का झाल्या — हितकारी ?
सर्वच मानव असती सर्वेश
परी एखाद्यास — देवपण.

६७

भेटावेसे वाटे गिरीला नभास
लाधे तों तयास — निसर्ग-श्री.
धरेचें पहावें अंतरंग वाटे
सागरा तों भेटे — रत्नाकर.
कवळावा गमे द्विजा अंतरिक्ष
सुखदावकाश — तोंच गाठी.

मानवास वाटे गाठावें प्रभूस
तोंच कल्पवृक्ष — त्यास भेटे.

६८

रवीमुळें झाला रजनीचा दिन
नर नारायण — करणीनें.
बियांचें रोपटें केलें जीवनानें
आणिक ज्ञानानें — चराचर.
भावनेनें जगीं सुखदुःख झालें
अंतःचक्षूमुळें तम — प्रभा.
माझें स्थित्यंतर देवा तुझेंमुळें
'वाईट चांगलें' — होत आहे.

६९

सुखवाया गाई खग वनराई
अंतरंग होई — त्याचें खुलें.
इंदूचें स्वागत सिंधू करी गात
अंतीं तो पावत — समाधान.
वंशतरूवर पवन सुस्वर
गाई तोही स्थिर — तेथें होई.
देवा माझें गान तुझियावरून,
अंतीं लाधे पण — चित्तशांती.

७०

शब्द मुखांतून बाहेर निघाले
वाऱ्यावर गेले — विरून ते.
सुरेल निघाली कंठांतून तान
अंतरिक्षांतून — संचरली.

हृदयामधून हृद्गत निघालें
भरून उरलें — अवकाशीं.
चित्तांतला भाव चित्तांत निमाला
स्वर्गीं पोहोचला — देवापाशीं.

७१

म्हणतोस सांग जगाला संदेश
तुझ्या जीवितास — आठवोनी.
"अज्ञात सगळें मागचें पुढचें
परी म्हणायाचे — ज्ञात सारे.
दुःखांत राहून मुखानें सुखाचे
पोवाडे गायाचे — वरवर.
आणि न कळतां लोपायाचे तमीं
प्रकाशाच्या धामीं — म्हणतच."

७२

पाहिल्यावाचून पुढचें पाऊल
टाकी न नाठाळ — चित्त माझें.
भूतकाळ ध्यानीं मनांत आणून
तें न जाणें ज्ञान — भविष्याचें.
धुक्याचें पटल एवढें सारून
त्यास दाखवून — मार्ग देई.
भ्यावयाचें नाही देवा तें चढाया
किंवा उतराया — गिरी दरी.

७३

ओठास लाविला शेवटचा प्याला
सुधा, किंवा घाला — विष त्यांत.

कड्यावर जीव उभा हा राहिला
लोटा वा सांभाळा—त्यास आतां.
शिरावर आहे खडी तलवार
करा खालीवर—इच्छेवर.
याचेपुढें पण पाहूं नका अंत
अंतीं विनवीत—देवा तुला.

७४

घायाळ समरीं झाला एक वीर
दुजा तों तयार—त्याचे जागीं.
प्रखर तापानें एक झरा आटे
दुसरा तों फुटे—जवळच.
खेळतांना डाव गड्याचा हुकला
पुढें तोंच आला—त्याचा भिडू.
माझ्या कर्तव्यांत होतां कांहीं उणें
निभावून नेणें—देवा तुवां.

७५

थोडका खेचावा वारू आधीं मागें
पुढें तेव्हां निघे—भरधाव.
जलौघ लोटावा थोडकासा मागें
वेगें तोंच लागे—वहावया.
धनुष्याची दोरी जितकी आखडे
तितका तों सुटे—शर वेगें.
देवा तुला गाया मन मागें घेई
स्थिती हीच देई—स्फूर्ति मला.

७६

ऐश्वर्याचे भोग जरी न लभती
लाधे चित्तशांती – नामीं तुझ्या.
मोराचा पिसारा निववी लोचन
जरी न शयन – झालें त्याचें.
चंद्राचें चांदणें मन आल्हादवी
क्षुधा न घालवी – तृषा जरी.
लावावी कसोटी काय व्यवहारीं
काव्याची माधुरी – चाखतांना.

७७

इच्छा नसतांहि वाहते सरिता
गोड गंभीरता – तीस येते.
नसतां मनीषा वाहतो पवन
लहर होऊन – जातो शांत.
हेतु नाहीं तरी कोकिळा गातसे
शांत रस वसे – तिच्या गानीं.
इच्छा नसतांही गातों देवा गान
येवो तें शोभून – तुझ्या पायीं.

७८

बाळ वीर झाला कौतुकून आई
त्याचेकडे पाही – वारंवार.
मोटनाडा घेई गोऱ्हा मानेवर
धन्याचें अंतर – संतोषतें.
पक्षिणीभंवतीं पिलें करितात
गुजगोष्टी होत – हर्ष तिला.

घेतों मी गायनीं देवा मोठेपण
अजाण म्हणून — चोज कर.

७९

वेशीपाशीं आला गांवचा चौघरी
झाले नर-नारी — बेभान तों.
नवरदेव ये बोहल्यावरतीं
गोंधळ सभोंतीं — उडे तोंच.
नव्याची पुनव आली सुकाळांत
दंगल खळ्यांत — उडाली तों.
प्रभुची चाहुल लागली जों चित्तीं
बेहोष तों वृत्ती — झाली माझी.

८०

बाळ खोडया करी लटकें उन्हांत
त्याचें बांधतात — घर तर.
उसना रुसवा गाय मनीं आणी
पान्हा आखडोनी — वासराचा.
लाडीकपणानें मारी निजपोता
सिंहीण चपेटा — मुखावर.
देवा नित्य चुका होतात हातून
गोड शिक्षा पण — कर मला.

८१

अस्तोदयापूर्वी रवीचें स्वरूप
राहते धरून — विशालता.
भरती ओहटी व्हावयाचेंपूर्वी
गंभीरता धरी — रत्नाकर.

झाले आणि आतां व्हायाचें वादळ
स्थिर भूमीतळ – म्हणून हें.
देवा तुझ्या गानीं होतें चित्त शांत
उदय कीं अस्त – समजूं हा ?

८२

माता आणि पिता दोघेहि प्रेमळ
मधें उभें बाळ – संभ्रमांत.
स्वर्ग आणि धरा दोघेहि स्नेहाळ
क्षितिज निश्चळ – मधें ठेलें.
दिनान्त रजनी दोघे समतोल
मधें संध्याकाळ – घुटमळे.
देवा तुझ्यापायीं आणि मायाजाळीं
माझी ही भ्रमली – मति आहे.

८३

हर्षानें उडाया लागे रत्नाकर
सोडी काठावर – लहरी तो.
खेळे संध्या रंग अनेक तुषार
लागे मेघावर – फेंकावया.
हिरवा शालू घे सृष्टी अंगावर
त्यांत चराचर – सुखवी ती.
तुझ्या अंतरांत हासे दयासिंधू
देवा एक बिंदू – दीनास दे.

८४

दिवसाचा शीण रवी उतरवी
संध्या तो भूषवी – पण त्यानें.

वसंत हृद्गत करी अंतीं खुलें
वनश्री तों डोले — आनंदानें.
दीनकथा मेघ भेटून भूमीस
कथी तों ये तीस — गोड कळा.
करितां जीवाचें दुःख रितें पायीं
देवा तुला होई — शीण काय ?

८५

उत्सुक मजला देवा थोडा वेळ
उभें राहूं द्याल — दारीं काय ?
एवढीच मुभा बोला काय घेऊं
येत जात जाऊं — मंदिरांत ?
थोडकी आणखी करूं का सलगी
येऊं का पर्येकीं — पायापाशीं ?
टेवाल का देवा सरोष अंतर
होता प्रिय दास — शेवटीं हा ?

८६

भय नको देवा बाळगू मनांत
फुलें उद्यानांत — खुडीन मी.
अथवा पाहून महार्ह रत्नास
मोहानें तयास — लुबाडीन.
दर्शन घडतां अजबखान्याचें
ढळेल तयाचें — नच रूप.
तुझिया विश्वांत देवा मी राहून
परत जाईन — आलों तसा.

८७

वेलीवर पुष्प झालें आहे म्लान
    कांहीं बीजावीण – त्यांत नाहीं.
आटलें नदीचें सगळें जीवन
    तेथें पात्रावीण – कांहीं नाहीं.
गेल्या पर्ण-शाखा तरूला टाकून
    एका खोडावीण – त्या न कोणी.
गेलें देवा माझें जीवित सुकून
    एका आशेवीण – तुझियाच.

८८

शशी आणि तारे यांस उजळून
    रवी हें भुवन – सोडितसे.
पुत्र आणि प्रजा पात्र झाल्यावर
    नृप राज्यभार – टाकितसे.
सुखीदुःखीतांना संतोष देऊन
    सुखानें सुमन – प्राण सोडी.
देवा तुझें विश्व झाल्यावर भक्त
    स्वर्गी बंधमुक्त – मग हो तूं.

८९

अनेक वृक्षांनीं शोभे वनराई
    अनेक रत्नांही – रत्नाकर.
नाना कल्पनांनीं शोभे महाकाव्य
    राजवाडा भव्य – दालनांनीं.
मानवांनीं येई भूगोलास शोभा
    तशी अंतरिक्षा – विहगांनीं.

ग्रहगोल यांनीं होई विश्व भव्य
किन्नर गंधर्व—यांनीं स्वर्ग.
माझ्या चित्तांतील अनेक कलांहीं
देवा तुझें होई—एक गान.

९०

गाभाऱ्यांत ध्वनी क्षणैक काढिला
घुमत राहिला—कांहीं काळ.
कानावर येई लकेर सुरेल
राही अल्पकाळ—श्रुतींत ती.
खग उडे गात सरितेवरून
कांहीं काळ स्वन—पात्रीं घुमे.
सर्वस्व खर्चून गातों देवा गान
होई अल्प पण—रंजन का ?

९१

पाडितात पैलू दुखवून हिरा
कराया रुचिरा—बाह्यकांती.
नित्य जाळितात कनकाची काया
मोल ठरवाया — व्यवहारी.

* * *

सौंदर्याची देवा विकृति पाहून
अंतरीं भुवन—संतोषतें.
कलाहीन माझें परंतु गायन
रसिका ऐकून—घेशील का ?

९२

गंधोदक देवा सपात्र चरणीं
ठेविलें अर्पुनी — नाहीं काय ?
वस्त्र बहुमोल किनारी; सादर—
केलें अंगावर — नाहीं काय ?
विकसित पुष्प सपर्ण हें माथां
ठेवियलें आतां — नाहीं काय ?
देवा! अर्पिता मी तन मन धन
सांगा पूजार्चन केलेंच ना ?

९३

आला आहे प्राण रवीचा कंठाशीं
बुडवी तो हास्यीं — वसुंधरा.
होईल सिंधूंत नदी नामशेष
चाले तिचा घोष — अजूनही.
प्रलयावधि हा उद्यांवर आला
विश्व संगीताला — करी तरी.
होईल का देवा माझा जगीं अस्त
तुझें गात गात — गुण-गान ?

९४

टकडीच्या आड रविबिंब आलें
उदय पावलें — वाटतें ना.
गर्द झाडींतून वाहतो निर्झर
आधीं दृग्गोचर — होत नाहीं.
पर्णाआड आहे पुष्प विकसलें
परंतु तें आलें — ध्यानांत ना.

माझ्या सन्निध का देवा वास तुझा
पडदा भ्रान्तीचा – आड पण ?

९५

क्षणोक्षणीं भेटे उषा क्षितिजास
दिसते जगास – एकदांच.
क्षणोक्षणीं ग्वाही काळ दे सर्वांस
वाटे प्रत्येकास – एकदां ये.
क्षणोक्षणीं भेटे भव्यता बीजास
दिसतो विकास – एकदां तो.
क्षणोक्षणीं देवा काय भेटतोस,—
व्हावयाचा भास – पण केव्हां ?

९६

दिसभर पक्षी फिरुन आकाशीं
आला घरट्यासीं – विसाव्यासी.
नदीच्या पात्रांत करी येरझारा
दिनान्तीं घे थारा – नाव तीरीं.
दिनराज प्रांत नभाचे उल्लंघी
रजनीच्या अंकीं पहुडाया.
व्याप सगळे हे ईश्वरा सारून
कधीं मी येईन – निजधामीं ?

९७

म्हणूं का देवा मी तुला लोकपाळ
दर्शन दुर्मिळ – ज्याचें आहे ?
बोलूं किंवा तुला मानकरी थोर
भेट ती दुष्कर – फार ज्याची ?

माझा संवगडी किंवा तूं असशी
दूर जो गांवाशी—गेला आहे ?
किंवा देवा माझा तूंच माय-बाप
बाळास अपाप—भेट मग.

९८

देवा माझें आहे चंद्रमौळी घर
तुझें तें मंदीर—थाटीन मी.
जवळच वाहे शुद्ध भीमाजळ
करीन त्रिकाळ—अभिषेक.
भागवील नित्य क्षुधातृषा तुझी
कपीला दारची—गाय माझी.
आणिक कशाची नको तुज चिंता
चल तूं अनंता—घरीं माझ्या.

९९

कितीही आतपीं पादप तापला
वाहतां तोषला—वायुवीचि.
कितीही अंतरीं रागेजली माय
शिशूपुढें होय—आनंदीत.
शब्दावीण काव्य कितीही आडलें
स्फूर्तीसवें झालें—जागें पुनः
कितीही जाहलें चित्त पाषाणाचें
त्यास देववाचे—झरा फुटे.

१००

पडछाया नाहीं पाहिली अजून
दीप मालवून टाकिसी कां ?

बांधाबांध नाहीं झाली सामानाची
वाट प्रवासाची – बुजविसी ?
कांठचें न तारूं केलें मी मोकळें
दर्यांत खवळें – तुफान तों.
तुझिया ध्यानाची ही पूर्वतयारी
शेवटची परी – करिसी कां ?

१०१

सुकलेल्या पाना – गळत नाहींस
दुःख साहतोस – तरुवरी.
आडमार्गा पूर्ण बुजत नाहींस
गोळा करितोस – कांटेकुटे.
पंख नसलेल्या गरीब विहगा
वारा पिऊन कां – जगतोस ?
दुबळ्या असार माझिया जीविता
कशांत तूं आतां – गुंतलास ?

१०२

वाटतें थोडकें गातांना थांबावें
तुझ्या आयकावें – चाहुलीस.
कार्यांत निमग्न होतां पहुडावें
स्वप्नांत पहावें – तुझें रूप.
आवडीचा सारा पसारा लोटून
तुज आलिंगन – दृढ द्यावें.
विनंती परंतु – हातचें सोडितां
मी तुज मुकतां – होऊं नये.

१०३

चंदनाच्या गळीं पडली बाभळ
वट हे पिंपळ — एक झाले.
निवडुंगालागीं भेटे घोरपड
त्यांत तरवड — मिसळला.
जाईच्या मंडपीं गुलाब फुलला
जवळ हासला — गुलछबू.
सृष्टी ही प्रभूनें एकजीव केली
तुझ्यांत दुफळी — मानवा कां ?

१०४

आहे नाहीं अर्थ बाळाच्या बोलींत
नाहीं का हृद्गत — त्यांत त्याचें.
विकसित पुष्पीं गंध आहे नाहीं
हृदय का नाहीं — खुलें त्याचें.
सुख दे वा न दे वाऱ्याची लहर
मोकळें अंतर — तरी तिचें.
माझ्या गानीं देवा आहे नाहीं अर्थ
पण का न त्यांत — अंतरंग ?

१०५

पर्णाआड फूल फूलाआड गंध
गंधाआड मोद — भ्रमरास.
रात्रीआड दिन दिनाआड तेज
तेजाआड दृष्टी — लोचनास.

शब्दाआड काव्य काव्याआड अर्थ
अर्थाआड सुख — रसिकास.
देहाआड चित्त चित्ताआड आत्मा
आत्म्या आड लक्ष — देवा तुझें.

१०६

विचार-मालिका भ्रमे कल्पनेंत
ध्येयाचा आद्यंत — नेणुनीया.
अवकाशीं भ्रमे पुंज हा ग्रहांचा
शोध अज्ञाताचा — लावावया.
विशालपट हा विणीत चालला
काळ अज्ञेयाला — भूषवाया.
शून्यांतच देवा भ्रमो माझें मन
होईल म्हणून — 'साक्षात्कार'.

१०७

प्रातःकाल-गान द्विजवरें पूर्ण
कधींच गाऊन — केलें नाहीं.
वनराजगीत गाऊन वसंत
पूर्णतेस नेत — नाहीं कधीं.
पूर्णेंदु-संगीत झालें होणार न
सिंधूचे गाऊन — कधीं काळीं.
संगीत-सम्राटा देवा तुझें गान
कसें मी गाऊन — पूर्ण करूं ?

१०८

स्फुंदायास बाळ लागलें म्हणजे
आईनें पाहिजे — शांतविलें.
पाहिजे वर्षाव पावसाचा झाला
तप्त भूमितला — निववाया.
पाडस चुकलें माय त्याची त्यास
आधीं दावायास — हवी आहे.
देवा माझ्या जीवा 'ओढणी' लागली
पाहिजे काढली — तुवांच ती.

समाप्त

२१६५६

# प्रणय-गीते

## स्त्री आणि पुरुष

[सुनीत]

वेली आणि फुलांतलें वसतसें देहीं तुझ्या मार्दव
मी तों राकट चालतां पदतलीं संचूर्ण होती शिला.
उच्छ्वासावरतीं तुझ्या विहरतो पुष्पांतला सौरभ
सेवायास तयास सज्ज भवती होतो अलींचा थवा.
लागे भव्य गिरीस नित्य वणवा श्वासानलें माझिया
माझा वास न साहुनी निवसती गिर्यंतरीं श्वापदें.
शोभे लास्य तुझ्यापुढें मधुर तें देवांगनांचें सदा
दैत्यांचें घनघोर तांडव परी माझ्यापुढें चाललें!
आले मंगलभाव एकवटुनी जेव्हां विधीच्या हृदीं
वाटे त्या समयास मूस तनुची त्यानें तुझ्या ओतिली!
सर्वांगें असुरासवें झगडतां क्रोधानलें पेटली
त्याच्या हातुन तेधवा उतरली माझी कठोराकृती.
"इंदूची" पण बोललीस "महती वाढे रवीच्यामुळें
आहे यास्तव मी सदैव अपुल्या कक्षेमधें शोभुन!"

१०-११-२७

# तूं आणि तत्त्वज्ञ

[ सुनीत ]

देई भव्य निसर्ग ईश्वर मला संगीत गुंगावया
माझें गीत तुझ्यावरून परि हें घोळे सदाचें पहा.
आहे मानवजात हांसत मुर्दे माझ्या सभोंती किती
लोकीं एक तुझें स्वरूप मजला गे ! रम्य वाटे अती.
तत्त्वांचीं वचनें असंख्य भवती मी माझिया पाहतों
नाहीं एक तुझें तयांत म्हणुनी तीं शून्यता पावती.
साऱ्याही जनतेस ठाऊक असे मी थोर वाचस्पती
बोलाया उठतां तुझ्याविण दुजा मी शब्द ना जाणतों.
आचारावरतीं तुझ्या उमटतें माझें जगीं वर्तन
माझ्या भावकला सदा विकसती त्वच्चित्तवृत्तीवर.
मी माझेपण जाण सन्निध असे केलें तुला सादर
चित्तीं स्थापुन मूर्तरूप कारितों आहे तुझें पूजन.
–आहे मानव ईश्वराधिन असें तत्त्वज्ञ जें सांगती
तें वाटें न खरें तुझ्या बघुनिया बाले ! प्रभावाप्रती !

१२-५-१४

---

# मोहिनी

[ सुनीत ]

माझ्या दृष्टिपुढून दूर सरतां थोडी तिची आकृती
हंसींच्या जणु मालिका विहरती सद्भावना मानसीं.
अत्याचार अघोर आजवर जे हातून या जाहले
गेलें जीवित जें निरर्थक विझे त्यांची स्मृती दारुण.
ध्येयाचे दिसतात नंतर मनश्चक्षूस माझ्या गिरी

होतो भासहि अल्पकाल फिरतो माथ्यावरी त्यांचिया.
येते घेउन वाटते मजपुढें माला यशोदेवता
कंठीं ती पडणार – तोंच पुढती येते पुनः मोहिनी–
काया पूर्ण हिरण्मया रुळतसे माळा गळां कांचनीं
नक्षत्रद्युति भव्य भालपटलीं आहे जिच्या शोभत
जिंकायास चराचरास सजली जी का कटाक्षावर
दावोनी निज हावभाव दुसरी कीं उर्वशी मेनका !
–जाते लोपुन देहभान तिजला द्याया दृढालिंगन
होतो उत्सुक मी पुन्हा मिळवण्या धूळीमधें जीवन !

---

४८३६

## तो प्रसंग

[ चाल—भूपती वैभव ]

"तुजभंवती पडला हा वेढा हुजऱ्यांचा.
त्यांतून घडे वर्षाव तुला मुजऱ्यांचा.
केलेस पराक्रम शौर्याचे तूं मोठे
जरतारी शोभे तुज शेलापागोटें.
ये गाजतवाजत वेशीच्या बाहेर
ऐटींत होउनी घोड्यावरती स्वार.
पण गडी शिपाई साधा। होउनी
गेलास नातगोताला। सोडुनी
शुभकौल तुला मी द्याया। चोरुनी
अडखळलें होतें वेशीच्या दारांत
आठवे अजुन तो प्रसंग मज दिनरात."

२३–९–३२

---

## ती कल्पना

घेतां नांव तुझें मुखीं मधुर हीं बाळें हसूं लागली.
सारे आणि वनांतले विहगही गानामधें रंगले.
आनंदी परिवार घेउन सवें येऊं उषा लागली
– नेत्रीं पाहुनिया तुला पण गडे अश्रू उभे राहिले!
व्हावा स्पर्श तुझा म्हणून जगतीं हा वाहतो मारुत.
व्हावें दर्शन गे तुझें म्हणुन हा येतो नभीं भास्कर
सारा आणि निसर्ग रम्य दिसतो होता तुझी संगत.
– होतो कां सहवास गोड न कळे मातें तुझा दुःसह.
ध्येयाची तव उच्चता पटविती उत्तुंग सारे गिरी
कीर्तीची तव गे प्रभा वितरवी हा इंदु लोकांतरीं
सिंधू सद्गुणरत्नसंघ दडला सांगे तुझ्या अंतरीं
– होतों पाहुन हे उदास अगदीं मी मात्र अभ्यंतरीं.

* * *

लोकीं ठेविल काळ शोक करण्या मागें तुला वा मला.
या सौख्यांतहि मन्मतीस करिते ही कल्पना व्याकुला!

---

## तूं आणि लोकभ्रम

[ वृत्त – साकी ]

ध्यान लागुनी तुझें होतसे माझें चित्त उदास
जन वदती कीं यास लागला कर्तव्याचा ध्यास!
प्रेम तुझें ज्यावर तीं बसतो वेचित पुष्पें बागीं
भास जगाला कीं देवाची अति आवड यालागीं!
सहवास न मज रुचे जनांचा प्रिय वाटे एकांत
निसर्गगोडी जग वदतें तर यास असे अत्यंत!

प्राणावरचें संकट होतें तुझें निभाउन नेलें
तेव्हांपासुन जनहितकर्ता हें मज नांव मिळालें !
तुझ्या चिंतनीं पूर्ण निमाले राग लोभ जरि माझे
लोक बोलती निर्विकार मन झालें आहे याचें !

* * *

गाणीं आहें गात खरोखर तुझिया प्रेमरसाचीं
सर्व बोलती ' धन्य असो तर याच्या कल्पकतेची ! '

८-१२-२६

---

## विरोधी प्रेम

[ वृत्त – साकी ]

" माझ्या दारावरून होतें तुमचें जाणें येणें
झालें नाहीं परंतु तुमचे वरती चुकुन पहाणें !
तुमच्या मार्गीं सामोरी मी असेन कितिदां आलें
दृष्टीचें पण तुमचें माझें मीलन नाहीं झालें !
अपुल्या कानीं यावे म्हणुनी वदलें मी मधुबोल
कर्णपथावर परंतु तुमच्या झाले सारे फोल !
करित राहिले स्तुती आपुली तुम्हां कळेल म्हणून
थक्क जाहलें निर्विकार पण आपण हें ऐकून !
गायनवादन यावर कळलें फार आपुली गोडी
म्हणुन राहिलें गात लागतां चाहुल अपुली थोडी !
गभीर वृत्ती परी न यानें अपुली ढळली कांहीं
आणिक तेव्हांपासुन मजला गाणें रुचलें नाहीं !
—वरपांगीं नच तुम्हीं दाविलें प्रेम कधीं असलेलें
म्हणून माझें मानस आहे तुमच्यावर बसलेलें ! "

# तुझें गान गावें कसें ?

[ वृत्त – सुमन्दार माला ]

तुझ्या लोचनींचें पाहतांच पाणी
तृषार्तास या लाभतें जीवन.
मुखींचा तुझा चंद्रमा पाहतांना
मिळे या चकोरास संजीवन.
तुझ्या केशपाशावरी दृष्टि जातां
जडे सारखें या मयूरा पिसें.
तुझें गान गावें कसें सांग आतां
असें जाहलें चित्त वेडेपिसें.
तुझ्या हातच्या कंकणांच्या ध्वनीनें
हरीची क्षणीं बासरी भंगते.
मुखीच्या तुझ्या गोड आलापनादें
तसें गान विश्वांतलें थांबतें.
तनूच्या तुझ्या हालचालींमुळें या
महापंचभूतांत आत्मा दिसे.
तुझें गान गावें कसें सांग आतां
असें जाहलें चित्त वेडेपिसें.
तुला देवता मी वदावें तरी त्या
तुझ्या धाव घेतात पायाकडे.
गळां काय घालूं सुमन्दारमाला
फिकी ती तुझ्या वैजयंतीपुढें.
स्तवावें तुला काय आहेत सारे
प्रभूचे तुला भाट गाया तसे.

तुझें गान गावें कसें सांग आतां
अशें जाहलें चित्त वेडें पिसें.

---

## तूं आणि मायभू

[ वृत्त – मालिनी ]

अविरत जरि बाले येसि दृष्टीसमोर
नकळत वदनाची दाविसी चंद्रकोर
पदरहि जरि नेसी सावरोनी कटीतें
अवसर मज नाहीं दृश्य हें पाहण्यातें !
मजसि बघुनि बाले छेडिसी एकतार
असशि हृदय माझें जिंकण्यातें तयार.
मधुर मधुर घेसी या जरी गोड ताना
करिल परि तुझ्या या कोण गे कौतुकांना !
सकल सुगुण माझे आठवोनी मनांत
बससि रुचिर त्यांचा हार मोदें करीत.
अधिर जरि शिरीं तूं माझिया अर्पण्यातें
अवसर परि कोठें तो मला घ्यावयातें !
मजवर रचिसी तूं गोड सप्रेम गान
करिन कधिं पुढें मी फेड त्यांची म्हणून.
मज परि नित लागे ध्यास मन्मायभूचा
अवसर मज कोठें गे तुला गावयाचा !

१९२४

---

# धिक् मां पुरुषम्—

[ जाति– अवनी ]

आज मला पाहुनि तूं मधुर-स्मित केलें
दारुण हे घाव हृदीं कुठारिचे झाले.
चुकुनि तुझा माझा जनिं
आला सहवास घडुनि
नकळत गे प्रीतिगुणीं
भाव तुझे माझे मग एकरूप झाले.
मम गभीर बघुन मती
सुस्वभाव सहजगती
बद्ध करुनि विनयवती
हास्य मधुर वदनाचें लुप्त तुवा केलें.
मधुसुम निजकरिं घेउनि
हसत जवळ तें ठेवुनि
जावें तूं दूर निघुनि
सुकतां तें तेथ तुझे नेत्र भरुनि आले!
पुरुषाचें मन कठोर
अनल गमे तप्त घोर
दृढ मानुनि कनक थोर
कोमल मन ललनेचें दग्ध तयें केलें.
संभ्रमांत मी सुंदरि
हृदय दिलें अन्य करीं
—तूं अनन्य मजवर परि—
काय बघुनि हा विरोध हास्य तुला आलें

२–७–२९

# शाश्वत सौन्दर्य

[ वृत्त उपेंद्रवजा ]

चुंबी उषा केवळ एक वेळ
विशुद्ध भू-सुंदरिचे कपोल
गोडी तुझ्या या कमलाननाची
तिला परी लागतसे सदाची.

वर्षांतुनी केवळ चार मास
मेघोदरीं वीज करी निवास.
काळे तुझे विस्तृत हे मृगाक्ष
सेवावया ती परि नित्य दक्ष.

अस्तोदयीं चित्रविचित्र रंग
क्षणैक मेघावर शोभतात
तुझें परंतु प्रणयांतरंग
सदैव भूषा तनुलागिं होत.

ही वृक्षराजींतिल दाट छाया
देई श्रमार्ता दिवसा विसावा
काळा तुझा हा परि केशपाश
रात्रंदिनीं दे सुख लोचनास.

नभांगणीं पाहुन इंद्रचाप
आल्हाद नेत्राप्रति हो अपाप
तुझें परंतू बघतां नतांग
हृद्सिंधु मोदें भरतो अथांग.

१३-१२-२६

# सुकलेलें फूल

१

कृत्रिमता तूं कधीं लक्षणा दाविलीस नच लोका
यथार्थतेशीं तुझा जाहला होता पूर्ण सलोखा.
फूल गुलाबाचें सोन्याचें जनदूषित झालेलें
मी न पाहिलें केश-कलापीं कधीं तुझ्या वसलेलें.
निसर्गातलें प्रभुचें साधें फूल सोनचाफ्याचें
दृक्गोचर पण होई त्यावर भूषण गमलें साचें.
साथ द्यावया येइ कोकिळा तुझ्या गायनासाठीं
सूर धराया तुला न रुचली एकतार वा पेटी.
काव्य तुझ्यावर केलेलें मी लाक्षणीक अर्थाचें
तुला न रुचलें म्हटलेंस ‘ न हें वर्णन यथार्थतेचें. ’
‘ क्षणभंगुर हा कृत्रिम सारा भूलोकींचा वास ’
एक दिनीं तव मानस भुललें या निष्ठुर तत्त्वास.
आणि खरोखर यथार्थतेला भेट द्यावयासाठीं
काय अलौकिक झालिस तोडुन येथिल गाठी भेटी !

२

शेक्सपिअर तो आंग्ल कवीश्वर सुनीतशतक तयाचें,
‘मेघदूत’ मज तेवि आवडे श्रेष्ठ कालिदासाचें.
जगन्नाथ कविपण्डित सुखवी मला प्रेमगीतांत
स्विफ्टाच्या मी तथैव रमतों उदासीन चरितांत.
शेले किंवा कीट्स तयांच्या प्रेमभावगीतांचें
आजवरी तर नकळत झालें पारायणही माझें !

किंबहुना कवि थोर आजचे सुरस तयांचीं गीतें
प्रेमरसांनीं सुशोभीत मम होती मान्य मतीतें.
प्रेमगीत गाणारे सत्कवि गोविंदाग्रज तांबे
काव्यसुमावर सदैव त्यांच्या मानस माझें लोभे.
संदर्भ जरी गाण्यांत तुझ्या आले या सुकवींचे
आविष्करणच करतों तर तें मी माझ्या वृत्तींचें.

---

## दर्शन

[ सुनीत ]

गंगेचा अवतार काय फिरुनी हा होतसे भूवरी?
कोण्या सत्कविची सदेह विचरे कीं 'शारदासुंदरी'?
हर्षाच्या नव वल्लरीस फुटली किंवा नवी पालवी?
देई सोडुन देव काय अपुली ही भूतलीं थोरवी?
हातीं घेउन कीं फिरे सहजता प्रेमांत ही चारुता?
साध्वीची अथवा कुण्या अवतरे ही मुग्ध शालीनता?
कीं वातावरणांतुनी फिरतसे आनंदवृत्तीच ही?
जीवांची जगिं चेतनाच गमते कीं मूर्तता पावली?
सत्कृत्याविण कीर्ति मुक्ति अथवा ही काय भक्तीविणा
शक्तीवांचुन लावण्यास सजली सामर्थ्य देवी पणा?
अंधारांतुन तेज देत जगता तेजस्विनी कीं फिरे
इच्छेवांचुन कामधेनु सहजी ही का अशी संचरे!

* * *

कीं माझ्यासम दीन आणि दुबळ्या जीवास संजीवनी
ही होई क्षण एक कां प्रगटुनी मांगल्य देवी कुणी?

# उत्कंठा

[ वृत्त – सुमन्दारमाला ]

बहारास येई कळी मोगऱ्याची
तुझ्या केशपाशीं तिला राहुं दे.
पडे सागराच्या तळीं रत्नपंक्ती
गळां माळ त्यांची तुझ्या शोभुं दे.
फुलाया वनीं लागल्या पुष्पमाला
सुवासास पायीं तुझ्या येउं दे.
सभोंती सुटे मंद वारा तयाला
तुझ्या अंचलाशीं जरा खेळुं दे.
उषा भास्करा लाजुनी दूर राही
तिचा हात त्याच्या करीं देउं दे.
धरा पाहतां स्वर्ग लाजून जाई
तियेची तया भेटही होउं दे.
शरद्सुंदरी दूर सोडी वसंता
तयांची तशी भिन्नता लोपुं दे.
सखे ! आणि माझ्या जिवाच्या चकोरा
मुखीची तुझी चंद्रिका भेटुं दे.
फुटूं दे नवा कंठ या कोकिळेला
तिला आम्रवृक्षीं सुखें गाउं दे.
झडो दे पुरी सर्व ही वृक्षराजी
नवी पालवी ही तिला येउं दे.
पडो दे तसा बांध या निर्झरीचा
तिला मार्ग धावावया लाभुं दे.

तसे दाट्ट दे अंतरी भाव नाना
सखे! कारणीं ते तुझ्या लावुं दे.

## तुझें गान

[ जाति— अवनी ]

जवळ असुनि तुजवर ना एक गान झालें
काय सखे म्हणुनि तुझे नेत्र भरुनि आले!
दूर वनांतील फुलें
शुद्ध रूप ज्यांत खुले
मन माझें ज्यास भुले
बसलों मी गात तया त्यजुनि तुज सुशीले!
दूर ढगांतिल बिजली
चंचल जी सोनसळी
—स्फूर्तिप्रद मज गमली—
जरि भिडले मम नयना चंचल तव डोळे
गाउन मी जन भाविक
वादहि केले तात्विक
—जरि होतें स्वाभाविक—
भाषण तव मंजुळ मज बोध देत बाले.
हृदय खुलें करुनि आज
कवनाला विषय-साज
भूषविला गे तुझाच.
कंठिं तुझ्या घालाया मन अधीर झालें!

## ‘राग’

[ चालः—वीरा भ्रमरा. ]

“सांग कशास्तव म्लान जाहलें वदन तुझें सुंदरी ?
कोणतें दुःख वसे अंतरीं ?
त्रैलोक्याचा नाथ तुझा हा सेवेसी सादर
कशाचें दुःख तुला गे तर ?
आरक्त तुझे ओठ कापती थरथर कां हे असे ?
कशाचा राग तुला येतसे ?
का रागानें तूं प्रिये वदन वळवुन
राहसी पदतलीं दृष्टि अशी देउन ?
का मुग्धपणा तूं वरिसी हृदयांतुन ?
सांग सांग लौकरी नको तूं उत्कंठा लाउस
जीव हा होई कासाविस. ।”
“सर्व कांहिं जाणतां सुंदरा आपण हो अंतरीं
दाविता सोंग ढोंग वरवरीं !
‘स्वातंत्र्याचे’ आपण आहां ‘कैवारी’— कां असे—
ठाउकी सांगा मजला नसे. ?
अंधकार परवशतेमधला तुम्ही नाशितां सदा-
मुग्ध कां ? खरें असे ना वदा ?
मग सदाकदाची राया माझी सखी
एकुलती एकच ‘हिंदभूमि’ लाडकी
पारतंत्र्यपाशीं ठेवितसां कां अशी
दासीची तर एक विनवणी मुक्त करा लौकरी-
तियेला, खेळूं द्या जगभरीं.—”

## तूं अज्ञात म्हणून

दृष्टिक्षेप कुठून ? दर्शन जिथें आर्धी असें दुर्लभ
व्हावें भाषण कोठुनी ? नच जिथे तें नेत्रसम्मेलन.
जेथें स्पर्श असाध्य कोठुन तिथे प्रीतीमधें मीलन
तूं अज्ञात तरी तुझ्यावर सखे हें चाललें गायन.
नाहीं ज्ञात तरी सुखावह गमे तो काळ भावी मना
आद्यंता विसरून विश्व करिते हें प्रत्यहीं कूजना.
ठेवी सिंधु निजोदरीं सुरुचिरा अज्ञात मुक्तावली
तूं अज्ञात म्हणून आज गमते ही गोड गीतावली.

---

## अजब चीज

[ चाल – भला जन्म हा० ]

स्वैरवृत्तिला कविच्या आळा घालिल एकाक्षणीं,
अशी मज चीज दाखवा कुणी !
स्वैर धावतिल फार फार, तर सूर्याचे हे कर,
प्रकाशुनि अर्ध्या विश्वावर !
सिंधूची ही लहर फार तर, उसळुन जाइल वर,
नभीं इंद्राच्या पायावर;
प्रलयकाल तो येइल मोठ्या डौलानें सरसर,
एक जग करील जलमय तर—
सूर्यराज नाहीं, निजकक्षा सोडित,
हा सिंधू राही सदैव मर्यादित !
प्रलयकाल आहे दास्य सदा भोगित !

कवीश निर्मुनि चवथी दुनिया क्षणांत जातो असा
कुठेंही बागडण्या स्वैरसा !
विजयश्रीचे शिरपेंच शिरीं ज्यांच्या बहु शोभती,
पाउलें ते त्याचीं वंदिती.
गुंजन करिती आनंदें जे विश्वाचे गायक,
तया सकलांचा तो नायक.
सुंदर वस्तू जेथें साऱ्या जनमानस मोहिती,
तया त्या आलिंगुन राहती !
विपरीत तयाची रीत गमे त्रिभुवनीं,
त्याला न तुलाया पुढती जावें कुणी ?
मति कुंठित होते तयाचिया गायनीं.
सुटते त्याची स्वारी केव्हां जाते कोठें क्षणीं,
न याचा थांग लाविला कुणी !
स्वैरवृत्तिला त्याच्या आळा घालिल एका क्षणीं,
अजब ती एक चीज या जनीं !
तिच्याच जोरावरी मारितो सर्व अशा तो उड्या,
सोडितो प्रौढीच्या वावड्या,
ती गुणगुणारी अजब चीज कांहिशी,
सोडून तयाला जाइल जर मानसीं;
तर जाइल वाऱ्यावर विरुनी क्षणामधें तो तसा
सोडुनी हा खेळ स्वैरसा !

४८३६

# अभिप्राय

सा. न. वि. वि.

तुम्ही दिलेलें आशागीत हें कवितेचें पुस्तक गेले दोन दिवस अधून मधून पण पुष्कळसें वाचलें. त्याकामीं खर्चीं पडलेला सगळा वेळ कारणींच लागला असें वाटलें कारण, पुष्कळ कविता मला बऱ्या वाटल्या. अलीकडे पुष्कळच कवी कविता लिहितात व जो तो हौसेने आपापला संग्रह प्रसिद्ध करितो. नेहमीच असा एखाददुसरा काव्यसंग्रह मला वाचावा लागतो. हे सर्वच संग्रह मी हौसेने वाचतों असें नाही किंवा अनिच्छेनें तें वाचावेच लागले तरी त्या सर्वांपासून आनंद होतो असेंहि नाही. याचा अर्थ असा मात्र नव्हे की, ते सर्वच संग्रह वाईट असतात. त्यांतहि कांही अपवाद असतातच. पण अशा वाचनाचे वेळी कविता अधून मधून चाळाव्या, वाचाव्या हुंगाव्या आणि क्वचित् कोठे नवीनपणा, सुंदरपणा किंवा सुवासिकपणा वाटला तरच मग ती जरा बारकाईने वाचावी आणि मग अधिक आशेने दुसऱ्याहि कांही कविता चाळाव्या असें घडतें. याच पद्धतीने तुमच्याहि कविता मी वाचल्या. पण तसें करीत असतां बऱ्याच आल्हादकारक ठिकाणीं मी रमलों यांत शंका नाहीं. सामान्यतः तुमच्या कविता सुबोध व प्रसादयुक्त वाटल्या. चिंतनशीलता व भावनेची आर्तता या दोन विशेषांची छाया त्यांत बरीच दिसली. बऱ्यापैकी वाटलेल्या कवितेंत खालील कवितांची मी निवड करीन. 'तूं अज्ञात म्हणून' 'तुझें गान' 'तूं आणि लोकभ्रम' 'मोहिनी' 'स्त्री आणि पुरुष' 'गानसमर्पण' 'अजून आहे फुटावयाचें सख्या पुढें तांबडें' 'अनुताप' 'फुलमाळीण' 'खेड्यांतील घराकडे' 'निवडुंगाचें गाणें' वगैरे. ओढणीनामक अभंग स्मरणींतील अभंग पुष्कळ ठिकाणीं उत्तम साधिले आहेत. त्यांपैकी २४, ४३, ५७, ६०, ६६, ७६, ८७, ९५, ९९, १०४ हे विशेष चांगले वाटले. त्यांत व्यक्त झालेल्या भावना व कल्पना सुंदर आहेत.

ता. २९।७।३३.

न. चिं. केळकर

॥ श्री ॥

रा. पाठक यांचा काव्यसंग्रह वाचून काढला. बरा गोड वाटला तेव्हां मनाशीं गाऊनही पाहिला. एकंदरींत हळुवार व खुसखुशीत लागला; आणि कोठें खडे गोटे लागले तरी मधुरपणांत खोट वाटली नाहीं.

रा. पाठक यांनीं जरी आपल्या कवितांचीं तीन दालनें पाडलीं असलीं तरी त्यांची खरी बैठक एकच म्हणजे मधल्या दालनांतच मांडलेली उघड दिसून येते. शेवटचें प्रणयगीतांचें दालन पडवीचेंच बनविलेलें आहे. तसेंच नांवाच्या पाट्याही जरा घाईघाईनें रंगविलेल्या दिसतात. आशागीतांत निर-निराळ्या जातींच्या मंडळींची गर्दी दिसते. रा. पाठक यांचें खरें स्वरूप 'करुण' आहे आणि तीच ओढणी त्यास लागली आहे.

रा. पाठक यांचा मुख्य रस करुण– 'साध्याच' शब्दानें प्रभु द्रवतो हाच त्यांचा विश्वास त्यांच्या ठायीं चांगला पोसला आहे. रा. पाठक यांची कोमल करुण रचना पुढील अभंगांत मुद्दाम पाहावी. १०।१६।२०।४७।५१ ६६।७५।७८।८०।८२।८५।८७।७९।९८.

बुद्धीचा जोरही रा. पाठक यांच्या कवितेंत चांगला दिसून येतो. भाव-नेच्या नाजुक खेळापेक्षां बुद्धीची कुशल कसरतच रा. पाठक यांनीं अधिक केली आहे. आणि म्हणूनच ते देवाला प्रश्न करितात— काव्य करितांना होतां अगतिक उठते तिडिक मस्तकाची– परंतु– तुझें मी करितों– अर्धवट ध्यान– तरी का मन्मन संतोषतें ?—

त्यांचें मन अद्यापि हेलकावे खात आहे, थबकत आहे, बावरत आहे असें दिसतें. आणि म्हणूनच त्यांचा आशावादही 'अजून आहे फुटावयाचें सख्यापुढें तांबडें' इतकीच मजल मारतो; आणि जीविताच्या उपवनीं कळ्या गोंजारीत फिरायाची उमेद बाळगतो. कठीण पर्वत फोडले तर त्यांच्या हाताला गोड झरेच लागतात. रा. पाठक यांचा आशावाद कड्या-वरून उड्या टाकीत सागरासारखा गर्जत आणि विजेसारखा चमकत दिपवीत नाहीं.

'सांभाळून घ्या' हीच रा. पाठक यांची विनवणी आहे. त्यांच्या अंगचे गुण पाहतां ही नम्रता फारच खुलून दिसते. गोड गोड विविध वृत्तें, साधी सोपी भाषा; मनोहर कल्पना आणि निर्मळ भावना यांचा साठा रा. पाठक यांचेजवळ भरपूर आहे. आणि– त्यांच्या कवितांचे संगतींत सहृदय वाचक सहज रंगून जातो.

कांहीं लिहितांना, कांहीं योजतांना, कांहीं छापतांना कितीही केले तरी दोष राहून जातातच. आवर्षूनी येथें जो अवर्षूनीचा भास होतो (पृ. ५८) असे शब्ददोष 'प्रलयकाल' इ (पृ. ११३) किंवा विजयश्रीचे (पृ. ११४) असें रचनादोष वगैरे यामुळेंच आढळतात. पण, ते क्वचितच आलेले आहेत. दहाविसापेक्षां तशीं स्थळें आम्हास आढळलीं नाहींत.

नादमाधुर्य रा. पाठक यांच्या चालींत पुष्कळ आहे. फुलमाळीण वगैरे कविता याची साक्ष देतील. आणि म्हणून अशा कवितांची गोडी त्या वाचण्यापेक्षां गाण्यांतच खरी कळून येते. आणि त्यांत अरुणाला जेव्हां 'इहलोकींच्या परलोकींच्या मधली पळवाट' अशा मोहक कल्पनेचा सहज झटका रा. पाठक देऊन जातात तेव्हां मनांत प्रसन्नतेची एक लकेर उठल्याशिवाय खास राहात नाहीं.

रा. पाठक यांनीं आपल्या कविता प्रसिद्ध केल्यानें त्यांचा आनंद त्यांचे पाशींच न राहतां आतां सर्वांस वाटून घेतां येण्याची सोय झाली आहे. रा. पाठक यांचे यास्तव मनापासून आम्ही अभिनंदन करतो.

आ. शु॥ १० शके १८५५ — दत्तो वामन पोतदार

॥ श्री ॥

रा. पाठक यांनीं आशा-गीताची कच्ची प्रत मला वाचावयास दिली व त्याविषयीं लिहावयास सांगितलें. सर्व कविता एकदां, बहुतेक दोनदां व कांहीं तीनदां वाचून पाहिल्यावर जें माझें मत झालें तें मी देतों.

पुस्तकाचे तीन भाग असल्यासारखे आहेत. प्रथम बऱ्याच स्फुट कविता, नंतर ओढणींचे अभंग व शेवटीं पुन्हां थोड्या स्फुट कविता असा अनुक्रम आहे. पहिल्यांत विविध विषय आहेत, दुसऱ्यांत कवीच्या मनाला लागलेल्या ईश्वरविषयक ओढणीचे एकशेंआठ अभंग आहेत व तिसऱ्यांत प्रेमविषयक स्फुट कविता आहेत.

१९२२ सालापासून आतांपर्यंत त्यांचें हें कविता करावयाचें काम चालूंच आहे. बावीस सालीं म्हणजे वयाच्या सोळासतराव्या वर्षीं त्यांनीं लिहिलेली कविता वाचली म्हणजे कवित्व हें देवाचें देणें आहे, तें अभ्यासून यावयाचें नाहीं हें नेहमींचें सूत्र चांगलें ध्यानांत येतें. ‘ खेड्यांतील घराकडे ’ ही कविता कवींनीं या बालवयांत लिहिलेली आहे; तरी ती इतकी निर्दोष, सरळ व प्रेमळपणानें भरलेली आहे कीं, कोणत्याही शालोपयोगी पुस्तकांत ती आज देण्याच्या योग्यतेची आहे. कालानुक्रमें त्यांच्या कल्पनाशक्तींत, वृत्तींत व रचनेच्या सफाईंत अर्थातच फरक पडत चालला आहे व पुढील काव्यें अधिक सरस वठलेलीं आहेत. ‘ हे दीप लागले चोहोंकडे ’ ‘ पाळणा ’, ‘ सदरेतिल पैजेचे विडे ’ या कवितांतील शब्दांचा लखलखाट पाहिला म्हणजे कवीवर कै. गडकरी यांची छाप पडली आहे असें दिसतें. पण ती येवढ्या कवितांपुरतीच आहे. बाकी सर्व कविता त्यांच्या स्वतःच्या वळणाच्या आहेत. ओढणींतील कित्येक अभंगांतून ‘ रवींद्रा ’ चा प्रकाश घेतल्यासारखें वाटेल. पण याविषयीं फार झालें तर इतकेंच म्हणतां येईल कीं, ढब ती उचलली आहे. वैचारिक ऋणही रवींद्रनाथांकडून घेतलें आहे असें वाटत नाहीं. या दोन छाया-पडछाया सोडल्या तरी कवीचें कांहींच गमावत नाहीं. सर्व काव्य स्वयंस्फूर्त, अनुभवसिद्ध, प्रासादिक आणि सहज गाइलेलें असें वाटतें. कवित्वाच्या अधिकाराचा अहंकार, औद्धत्य, वाचकांस किंवा जनतेस चपेटे मारण्याची हौस या दोषांपासून कविता

सर्वथा अलिप्त आहे; इतकेंच नव्हे तर विनम्रभाव, आपल्या अधिकाराची केवळ सौम्य भावना, आणि वाचकांशीं बंधुभाव यांनीं आमूलाग्र मंडित झालेली आहे. कोणच्या तरी आपल्याला पसंत असलेल्या ती विचाराला जवळ जवळ निश्चेचें रूप प्राप्त करून दिलें म्हणजे विचारपोष पुरेसा झाला असें मानण्याकडे जो कवींचा कल असतो तो येथें कोठेंही नाहीं. उलट मर्यादा, व्यंजना आणि प्रांजलपणा यांनीं अंकित झालेल्या अभिरुचीचाच विलास सर्वत्र दिसतो. 'टीकाकार' या कवितेंत टोचून बोलतां येण्यासारखें होतें व 'धनवंतास' या कवितेंत खुनशीपणानें शाप देतां येण्यासारखा होता; पण कवीनें मोठ्या नाजूकपणानें टीकाकाराशीं मैत्री जोडिली आहे व धनवंतास सदिच्छेनें आशीर्वाद देऊन लाजविलें आहे. 'निर्वाणीचा सवाल' या कवितेच्या शेवटच्या ओळींतच काय तो एकदां रुचि-विकार झालेला दिसतो. खेडेगांवची राहणी आणि वात्सल्यबुद्धि आपल्या भोळसर भावानें व खेळकर वृत्तीनेंच व्यक्त झाल्या आहेत, हें खेड्यांतील आनंद, बाललीला, विश्वाच्या उपवनांत इत्यादि कवितांवरून स्पष्ट दिसेल. कवीच्या बुद्धीला विचाराचें वळण आहे, हें अनेक कवींनीं हाताळून सोडलेला जो 'अरुण' त्याच्याविषयीं लिहितांना कवीनें स्पष्ट दाखविलें आहे. विश्व-कटाहांतील अंतराळांतून झेपावत जाण्याला लागणारें सामर्थ्य 'फुलमाळिण' या कवितेंत चांगलें दिसतें; कारण, आकाशाच्या पोकळीचा मळा पिकविणारी ही फुलमाळिण आद्यंताच्या टोकावरती मौजा करणारी आहे ! पुस्तकावरून पाहतां मनांत येणारे विचार व्यक्त करावयास कवीला कांहींच अडचण पडत नसावी असें दिसतें; पण ज्याच्या अडचणी त्याला माहित ! अलौकिक कल्पना सुचावी पण ती व्यक्त करतां येऊं नये असें कवीचें होतें असें दिसतें. प्रतिभेचें हें झुकांड्या देणारें स्वरूप 'मायावती' या कवितेंत उत्कृष्टपणें व्यक्त झालें आहे. 'तो प्रसंग', 'विरोधी प्रेम', 'तुझें गान गावें कसें ?' या कवितेंतील मधुर प्रेमभाव हा मनोज्ञ शृंगाराचा केवळ नमुनाच होय. प्रेम व काव्यालंकार यांचें जें गमतीचें मिश्रण 'तुझें गान गावें कसें ?' यांत केलें आहे तें इतरत्र दुर्मिळ आहे. मात्र देशाभिमानाच्या कवितांतील शब्दवैभव सोडून दिलें तर त्यांत कांहीं विशेष आहे असें मला मुळींच वाटत नाहीं. तथापि त्यांच्यामुळें कविता-संग्रहाची सौंदर्यहानि झाली-

आहे असें नाहीं. पण कवीच्या मनाचें मुख्य लक्षण म्हणजे ईश्वरविषयक तत्त्वज्ञानाकडे पुन्हां पुन्हां वळणें हें होय आणि त्याच लक्षणानें प्रायः बहुतेक कवनांना उदात्तपणा आलेला आहे. या लक्षणाविषयीं खुलाशानें लिहावयास हवें.

परमेश्वराच्या अस्तित्वाविषयीं सर्व विचारी माणसांच्या मनांत जसें काहूर उत्पन्न होतें तसेंच तें कवीच्याही झालें आहे. आपल्याला त्याचें खरोखर ज्ञान नाहीं हें त्यांनीं हरतऱ्हेच्या वळणांनीं सांगितलें आहे. पण एकदां तर अज्ञेयवादाची भूमिका सोडून नास्तिवादाची अस्तिपक्षी भूमिकाही त्यांनीं घेतली आहे. "देव नाहीं जगीं धर्म नाहीं तसा, कल्पना या खुळ्या मानसा, जन्ममृत्यूच्या गूढ तत्त्वज्ञानांत विनाकारण कां गुंतावें ? आजपर्यंत जे तत्त्वसंशोधक झाले त्यांनीं तरी काय साधले म्हणजे सिद्ध केलें ? बुद्धीला शीण देऊन 'देव, परमेश्वर' असले शब्द नाहक निर्मिले ! मना, हें सर्व सोडून दे; तुझा धर्म स्वैरता आहे." असे विचार त्यांनीं प्रकट केले आहेत. ओढणीचे अभंग खास स्वतःच्या भावना या भूमिकेनें त्यांनीं लिहिले आहेत. पण आतांच सांगितलेले नास्तिकपणाचे विचार "नास्तिकाचे विचार" या मथळ्याखालीं दिले आहेत ! म्हणजे अर्थ असा कीं, हे नास्तिकपणाचे विचार माझ्या मनांत आलेले असतील पण ते 'माझे' म्हणावें असें मला वाटत नाहीं. यांत कवीच्या मनाचा कल चांगला दिसून येतो. 'मला माहित नाहीं' असें म्हणणें किंवा 'तें कळण्यासारखें– मला तरी– नाहीं' असें म्हणणें हें निराळें व 'देव नाहींच' असें अस्तिपक्षीं विधान करणें हें निराळें. 'देव नाहींच' असें म्हणणाराला बरीच माहिती आहे व त्याचा शोध बराच झालेला आहे अशी अटकळ कोणी केल्यास त्यांत कांहीं गैर नाहीं. अर्थात् ही भूमिका पतकरावयास 'नाहीं' म्हणणारा पराकाष्ठेचा ज्ञानी नाहींतर साहसी तरी असला पाहिजे. प्रस्तुत कवीला यांतले आपण आहों असें मुळींच वाटत नाहीं व म्हणून उत्पन्न झालेले विचार लिहून 'नास्तिकाच्या मनांत शिरून पाहिलें असत काय दिसेल तें हें' अशा थाटानें त्यानें सांगून टाकलें आहेत. असो. कवीनें 'मला माहित नाहीं' हें प्रांजलपणानें सांगितलें आहे; पण त्याचें रूप माहित व्हावें म्हणून मात्र भारी आर्जवें केलीं आहेत. हीं

आर्जवें म्हणजेच या आशा-गीताचा मुख्य भाग होय; व त्याचें मुख्य सौंदर्यही होय.

इतर कवितांत दिसून येणारी सफाई व सोपेपणा या अभंगांत अधिकच दिसून येतो. प्रत्येक अभंगांत प्रथम कांहीं सृष्टिव्यापाराचे दाखले घेऊन ते व्यापार आपल्या ज्या मनोगताला उपमा शोभतील तें मनोगत सांगावयाचें अशी पद्धत त्यांनीं ठेविली आहे. अर्थात् सर्व अभंगांतील हीं मनोगतें एकत्र केलीं म्हणजे कवीला काय म्हणावयाचें आहे हें दिसणार. म्हणून मी तीं सर्व ओळीनें उतरून काढलीं. ठेका, गायन, इत्यादींनीं अनंकित असे कवीचे विचार गद्यांत उतरून काढले म्हणचे एक फायदा असा होतो कीं, त्या विचारांना जातीचें सौंदर्य व बल काय आहे हें चांगलें अजमावितां येतें म्हणून तसें केलें. हें तपासून पाहिलें म्हणजे या अभंगांना प्रार्थनेचें रूप आलें आहे हें दिसून येतें. या प्रार्थना फार कोमल, सूक्ष्म, घरोव्याच्या, क्वचित् सलगीच्या सुद्धां आहेत. ७, ९, ११, १२, १५, १८, २४, २६, ३२, ३८, ४१, ४६,४७, ५१, ६२, ६६, ६८, ७१ ७४, ७५, ७९, ८०, ८१, ८२, ८६, ८७, ८९, ९८, १००, १०२, १०४, १०५, १०८ या प्रार्थनांतील विचार व त्यांची मांडणी हीं अत्यन्त मनोहर आहेत. यादीच दिली असल्यानें ते विचार सांगण्याची जरूरीच नाहीं. प्रार्थना करतांना अर्थातच देवाचें अस्तित्व मानलेंच आहे; पण रूप कसें तें माहित व्हावें अशाबद्दल प्रार्थना केल्या आहेत. ही भूमिका मामूलच आहे. पण तं पतकरल्यानंतर मात्र जे विचार कवी बोलला आहे व ते ज ज्या पद्धतीनें बोलला आहे ती अत्यन्त उदात्त, निर्मल आणि पवित्र अशी वाटते. वास्तविक प्रार्थनेंतील विचारही नवीन आहेत असें नाहीं. पण आपल्याला ते सुचतील का असें वाचकानें मनाशीं विवंचून पाहिलें तर सुचणार नाहींत असें त्यास वाटेल. म्हणून त्याला ते नवीन वाटतील. पण ते सांगण्याची पद्धत तर वाचकांना नाहींच नाहीं पण किती सराईत कवींना सुद्धां साधेल याविषयीं शंका वाटते ! वास्तविक वारा, पाऊस, ऊन, सकाळ, संध्याकाळ, क्षितिज, चांदण्या, चंद्र, सूर्य मूल इतकेंच भांडवल कवीपाशीं आहे पण त्यांचे निरनिराळे व्यापार, प्रसंग, त्यांच्या चमत्कारिक भेटी इत्यादि त्यानें इतक्या तऱ्हांनीं पाहिल्या व दाखविल्या आहेत कीं,

नेड्मींच्या या प्रकारांत किती सौंदर्य भरलें हें पाहून वाचकाचें मन अत्यन्त प्रमुदित होतें. हीं सौंदर्यें दाखवितांना कवीला कष्ट पडत नाहींत हें पाहून तर फारच कौतुक वाटतें. । साध्या शब्दासवें कविता रांगते, तीस कां लागते यातायात । असें कवीनें विचारलें आहे ! उत्तरादाखल एवढेंच म्हणतां येईल कीं हें फार थोड्या कवींना म्हणतां येण्यासारखें आहे.

श्री. म. माटे

: ग सं ग्र ह टा. स्थळमत.
वनुक्रम २५८५५ वि ८३८०८...
क्रमांक ९३५८ नों: दि: ३।९।३।५८
REFBK-0004936
REFBK-0004936

# आशा-गीत

## [ ओढणी व इतर कविता ]

१०३३
म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. नं. ९३६५६

REFBK-0004936

वा. भा. पाठक
एम. ए.